

कनेटिकट महाराष्ट्र मंडळ

# गजरा

दिवाळी २०२३





चित्रकला: प्रेरणा ढगे

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| अध्यक्षीय | मुकुंद आवटी |
| २०२३ आढावा | कार्यकारीणी मंडळ |
| मराठी शाळेचा आढावा २०२३ | नुपूर कुलकर्णी, दीपम थवली |

| | |
|---|---|
| पुनःश्च गजरा | हेमंत कडेगांवकर |
| प्रथम तुज पाहता | सुधीर ओक |
| नाच मेरी जान | वर्षा देशमुख |
| शब्दकोडे | विनोद पाटील |
| बाईपण भारी देवा !! | ज्योत्स्ना कुरकुटे |
| Astrophotography | Hanif Girach |
| माझा गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचा प्रवास | प्रीति गुंडपवार |
| प्रिय आई - बाबा | नमिता दांडेकर |
| डॉलर तुझ्याचसाठी | कल्याणी आलोक पंडित |
| The Predicament | Namit Tamhane |
| माझा आवडता प्राणी | सुशांत गोसावी |
| त्या वळणावर | रश्मी साठे |
| Gautam from my perspective | Alpana Naik |
| साधना | मनोज बा. उपाध्ये |
| शक्यता विरुद्ध लढा | मीनल अवचट |
| हसरे दुःख | शकुंतला नरवाडकर |
| माझ्या सवयी | सोहम बिराजदार |



प्रकाशन दिनांक:

शनिवार, १८ नोव्हेंबर २०२३


मुखपृष्ठ कलाकृती:

- प्रीति गुंडपवार (left)
- प्रेरणा ढगे (top right)
- अवनी अवचट (bottom right)

# अध्यक्षीय



नमस्कार मंडळी.

सिद्धिबुद्धिप्रदे देवी भुक्तिमुक्तिप्रदायिनी!

मंत्रपुते सदा देवी महालक्ष्मी नमोस्तुते!!

महालक्ष्मीला नमन करून माझ्याकडून आपणा सर्वांना दीपावलीच्या पुन्हा एकदा खूप खूप शुभेच्छा.

मला सांगण्यास अत्यंत आनंद होतोय कि गेली काही वर्षे खंडित झालेला “गजरा” वार्षिक अंक माझ्या कार्यकारिणीच्या कारकिर्दीत पुन्हा एकदा प्रकाशित होतोय. अगदी काल परवाची गोष्ट वाटतेय, जेव्हा मला कनेटिकट महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष म्हणून घोषित करण्यात आले आणि नंतर मी माझ्या २०२३-२४ च्या कार्यकारिणीची ओळख करून दिली होती. आणि आज, आज त्याला चक्क एक वर्ष पूर्ण झाले सुद्धा. वेळ कोणासाठी थांबत नाही हे ऐकलंय, आणि अनुभवलंय सुद्धा. पण म्हणून काय झालं? १२ महिने असेच पाहता पाहता निघूनही गेले. असो.. पण आपणा सर्वांनाच माहिती आहे कि गेले एक वर्ष काही “असेच” नाही निघून गेले :)

आमची कारकीर्द एक अवघड निर्णय घेऊनच सुरु झाली. COVID-१९ महामारी एकदाची संपल्याने शुल्काधारित सभासद नोंदणी उपक्रम पुन्हा एकदा सुरु करण्यात आला, पण तेही अगदी माफक शुल्क आकारून. सध्या मंडळाचे १५० च्या वर सभासद कुटुंबे आहेत, पण खरे सांगायचे तर हा आकडा २०२४ मध्ये ३०० पर्यंत तरी जावा असा आमचा प्रयत्न असेल. त्यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य मिळणे अत्यंत गरजेचे आहे आणि ते मिळेल अशी अपेक्षा आहे.

२०२३ ची सुरुवात झाली ती अगदी आगळ्यावेगळ्या प्रकाराने सादर केलेल्या मकर संक्रांतीच्या कार्यक्रमापासून. प्रचंड प्रतिसाद मिळाला त्या कार्यक्रमाला. ह्या कार्यक्रमात आम्ही एक नवीन आणि नामांकनाधारित असा “CTMM गौरव पुरस्कार” जाहीर केला. उद्देश एकच, कोणत्याही

क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या आपल्या मंडळ सभासदांचे जाहीररित्या तोंडभरून कौतुक आणि विजयचिन्ह देऊन सत्कार. त्यानंतर आपल्या नवीन कार्यकारिणीने जी घोडदौड सुरु केली ती गुढीपाडवा आणि गणेशोत्सवाच्या कार्यक्रमांना मिळालेल्या विक्रमी उपस्थितीतून कायम राहिलेली दिसली. ह्या वर्षीच्या सर्व कार्यक्रमांतून आम्ही काही गोष्टी मात्र कटाक्षाने पाळण्याचा आणि जपण्याचा प्रयत्न करतोय आणि त्या म्हणजे - महाराष्ट्राची परंपरा, विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा दर्जा, महाराष्ट्रीयन खाद्यपदार्थांची रेलचेल, सर्वांचा सहभाग, प्रोत्साहनकारक बक्षिसे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे परवडणारे तिकीट दर. अशा कार्यक्रमांद्वारे, अमेरिकेसारख्या परदेशात राहून सुद्धा महाराष्ट्राची संस्कृती, आणि वारसा जतन करण्याचा आम्ही नेहमी प्रयत्न केलाय आणि त्याचा तुम्हा सर्वांना आनंद आणि अभिमान वाटत असणार.

दरम्यान, आपण पहिल्यांदाच आयोजित केलेल्या ५K धावणे आणि क्रिकेट च्या स्पर्धां सुद्धा प्रचंड यशस्वी झाल्या, अगदी Once more मिळण्याइतक्या. ह्या दोन्हीही स्पर्धा पुढच्या वर्षी अजूनही मोठ्या प्रमाणावर आणि व्यावसायिकरित्या करायचा आमचा मानस आहे. ३ मराठी चित्रपट - पावनखिंड, बाईपण भारी देवा आणि वाळवी - सुद्धा कनेटिकट मध्ये प्रदर्शित करण्यात आले. “बाईपण भारी देवा” च्या वेळेस चे रंगीबेरंगी रील्स आणि फोटोस अजूनही डोळ्यासमोर आहेत.

आपल्या कनेटिकट मधले हवामान एप्रिल - मे मध्ये जरा चांगले झाले आणि आपण लगेच आपल्या नादब्रम्ह ढोलताशा पथकाची सुद्धा घोषणा करून जोरदार सराव आणि परफॉर्मन्सस सुरु केले. आपल्याला २-३ ठिकाणी आपला ढोलताशा परफॉर्मन्स करायला आमंत्रणे सुद्धा मिळाली. पुढच्या वर्षी आपल्या ढोल ताशा पथकाचा अजून विस्तार करण्याचा मनसुबा तर आहेच, पण कुठलेही निमंत्रण घेण्यास सदैव तयार राहण्यासाठी जरूरी असलेला नियमित सराव सुद्धा करण्यात येईल.

सगळे कसे छान चालले आहे असे वाटत असतानाच, CTMM सोबत बरेच वर्षे संलग्न असलेले आपले हुशार, खुशालचेंडू आणि हरहुन्नरी व्यक्तिमत्वाचे कार्यकर्ते श्री. गौतम नाईक ह्यांचे आकस्मिक निधन झाले आणि जवळ जवळ महिनाभर आपला CTMM कट्टा ग्रुप शांत झाला. कामे थांबली. त्यावेळेस आपण सगळे मंडळ सभासद जणू एक खूप मोठे कुटुंब होऊन श्रीमती अल्पना नाईक ह्यांच्या पाठीशी उभे राहिलात. त्याबद्दल, पुन्हा एका आभार. स्व. गौतम ह्यांचे CTMM प्रति केलेले योगदान कायम स्वरूपी लक्षात राहावे म्हणून मंडळाने त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ उत्कृष्ट अभिनय पुरस्कार जाहीर केलाय. पुन्हा एकदा, ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो हि प्रार्थना.

CTMM शाळा उपक्रम सुद्धा वाढतोय. आपल्या साऊथ विंड्सर शाखा नोंदणी मध्ये ह्या वर्षी जवळ जवळ २५% वाढ झाली आहे. तसेच ह्या वर्षांपासून आपण एक नवीन शाखा सुरु केलीये

डॅनबरी ला आणि तिथेही नोंदणी सुरु झाल्यात. ह्या शाखांचे संचालक सौ. नुपूर कुलकर्णी, सौ. दीपम थवाली आणि श्री. संकेत ओक, तसेच सर्व शिक्षक वर्ग ह्यांचे खूप कौतुक आणि आभार.

हे सर्व शक्य होतेय मला साथ देणाऱ्या माझ्या कार्यकारिणी समिती मधील अतिशय कार्यक्षम सहकाऱ्यांमुळे - स्नेहा, वैभवी, विक्रम, अमेय, हेमंत, शिल्पा आणि जोत्सना. तुम्हा सर्वांचे आभार मानावे तेवढे कमीच.

आणि ह्या एका वर्षात आम्हा कार्यकारिणीला काय मिळाले? आम्हाला तुम्हा सर्वा सभासदांकडून मिळालंय ते म्हणजे भरभरून प्रेम , प्रोत्साहन, अविरत सहकार्य, पुरेपूर सहभाग, मार्गदर्शन आणि मनमोकळा व सडेतोड अभिप्राय. ह्या सर्वांचा तेवढाच मान ठेवून, आणि प्रेरित होऊन, आम्ही CTMM च्या विस्तारासाठी सज्ज आहोत. मंडळावरील आपला स्नेह असाच कायम असू द्यावा हि विनंती.

जय महाराष्ट्र!

आपला विनम्र,

**मुकुंद देविदास आवटी**

अध्यक्ष

कनेटिकट महाराष्ट्र मंडळ (CTMM)



## कार्यकारीणी मंडळ 2023-24

डावीकडून: मुकुंद आवटी (अध्यक्ष), स्नेहा सूर्यवंशी (उपाध्यक्ष), हेमंत कडेगांवकर, ज्योत्स्ना कुरकुटे, अमेय टुमणे, वैभवी पंडित (सचिव), शिल्पा कुलकर्णी, विक्रम भावे (खजिनदार)

# २०२३ आढावा















# संक्रांत





संक्रांत म्हणजे इंग्रजी नववर्षातला पहिला मराठमोळा सण. सूर्याचे उत्तरायण सुरु झालं याची वर्दी देणारा. वाण, तिळगुळ, हळदी - कुंकू, बोरन्हाण या सगळ्याचा सण. हे सगळं जोवर यथासांग पार पडत नाही, तोवर खरतर सूर्याची प्रखरता जाणवतच नाही. कनेटिकट च्या थंडीत सूर्याची प्रखरता तर नाही, पण मायेची, आपलेपणाची, आपल्या संस्कृतीची ऊब अनुभवून  २८ जानेवारीला कनेटिकट महाराष्ट्र मंडळाचा संक्रांतीचा कार्यक्रम धमाकेदार साजरा झाला.

हळदी- कुंकू, वाण आणि तिळगुळ देऊन आलेल्या सर्व सवाशणींचे स्वागत EC तल्या महिलांनी केले. खाण्याची रेलचेल, बोरन्हाण, फॅशन शो आणी प्रथमच आयोजित केलेल्या अंताक्षरी चा सर्वांनी मनमुराद आनंद घेतला.

संक्रांतीसाठी खास असणाऱ्या काळ्या रंगाच्या पारंपरिक पेहरावात लहानांपासून वृद्धांपर्यंत सगळे तयार होऊन आले होते आणि खास आकर्षण असलेल्या सुंदर अशा नथीचा नखरा फोटोबूथ पाशी फोटो काढून कार्यक्रमाचा आनंद घेतला.

CTMM कार्यकारी समितीने २०२३ जानेवारीपासून ज्यांनी आपल्या अतुलनीय कारकिर्दीने समाजात वेगळे स्थान निर्माण केले आहे त्यांचा गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यास सुरुवात केली. त्या पुरस्काराची पहिली मानकरी ठरली सौंदर्यवती मोहन नामले जोग.

या कार्यक्रमात घेतलेल्या पतंग स्पर्धेत मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता आणि सोहम दानवे व आरीत विलकर या स्पर्धेचे विजेते ठरले.

अंताक्षरीच्या अटीतटीच्या स्पर्धेत विनय पाडोळेच्या टीम ने चषक पटकावला .

**- ज्योत्स्ना कुरकुटे**

# गुढी पाडवा

गुढी पाडवा किंवा मराठी नववर्ष हे दोन शब्दांवरून त्याचे नाव पडले आहे - 'गुढी', ज्याचा अर्थ हिंदू भगवान ब्रह्मदेवाचा ध्वज किंवा प्रतीक आहे आणि 'पाडवा' म्हणजे चंद्राच्या टप्प्याचा पहिला दिवस आणि सण हा सणाची सुरुवात आहे. कापणीचा हंगाम आणि महाराष्ट्र राज्यात मोठ्या उत्साहात आणि उत्साहाने साजरा केला जातो.

CTMM पाडवा हा Talent Show वर आधारीत असातो. या वर्षा, 'महाराष्ट्राची लोकधारा' हया कल्पनेवर अधारित, हा टॅलेंट शो प्रदर्शित केला.

नृत्य आणि गाणी है चे Talent Fusion सादर केले गेले. लहान मुलंपसून ते आजी आजोबं पर्यंत सर्वान्नी त्यात भाग घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात EC टीमच्या नृत्य आणि गाण्याने झाली. त्यानंतर टॅलेंट शो सुरू झाला.

गोंधळ, पोवाडा, भजन पासुन ते लावणी, डोंबर्याचा खेळ हे सर्व पाहुण पाहुन थक्क झाले. एकंदरीत परिक्षाकैची विजेते निवडताना नकेनौ आली.

CTMM मराठी शाळेद्वारा आयोजित 'संतांची महिमा'प्रहसनला सगळ्यांनी भरगोस प्रतिसाद दिला. विठ्ठल रखुमाई ला बघून तर काहि आजी आजोबा उभे राहूं नमस्कार करत होते.

CTMM च्या कलाकारांनी प्राचीन महाराष्ट्रावर आधारित फोटो बूथ तयार केला होता. वारली पेंटिंग आधारित हा बॅकड्रॉप सर्व उपस्थितांसाठी गोटो पॉइंट होता.

शेवटचे पण किमान नाही, महाराष्ट्रीयन सुगरणिनी केलेले ते खाद्यपदार्थ प्रत्येकजण बोटे चाटून खात राहिले. मिसळ पाव, पिठला भाकरी, श्रीखंड ते दाबेली, पाणीपुरी, साबुदाणा खिचडी and more अश्या चविष्ट मेनूच घेतला.

गौरव पुरस्कार आणि Talent Show पुरस्कार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

'महाराष्ट्राची लोकधारा' कल्पनेमुळे सर्वांचे महाराष्ट्राची संस्कृती दर्शन झाले. सर्वजण छान अनुभव घेऊन निघाले. धन्यवाद!

**- शिल्पा कुलकर्णी**







# 5K WALK/RUN









कनेटिकट महाराष्ट्र मंडळाने पहिल्यांदाच 5K वॉक अँड रन हा कार्यक्रम BMM च्या Outdoor Initiatives च्या संकल्पनेला धरून आणि महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने आयोजित केला जो तुमच्या सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे खूप यशस्वी झाला. सर्व वयोगटातील लोक सकाळी फार्मिंटनच्या उद्यानात जमले होते. हवा अगदी आल्हाददायक, स्वच्छ आकाश अस सुंदर वातावरण होत. उपस्थित सगळेजण CTMM 5K वॉक/रन मध्ये सहभागी होण्यासाठी उत्साही दिसत होते. काही प्रो रनर, काही फर्स्ट टाइमर आणि काही उत्साही वॉकर होते! हेल्दी स्नॅक्स आणि पाण्याच्या बाटल्यांसोबत CTMM चा लोगो असलेले टी-शर्ट्स चे वितरण करण्यात आले. 5K धावणे/चालणे ची स्पर्धा वेळेवर सुरु झाले! प्रौढ, तरुण आणि लहान मुले तसेच त्यांच्या ६० आणि ७० च्या दशकातील ज्येष्ठांचा सहभाग पाहून खूप छान वाटले. ज्यांचे अत्यंत उत्साही परफॉर्मन्स इतरांच्या बरोबरीचे होते किंबहूना जरा जास्तीच होते! या EC ने सर्व कार्यक्रमांमध्ये सेल्फी बूथ ठेवल्याने सेल्फी गेनेशनला आणखीनच मजा येते. या कार्यक्रमातही ५की चा सेल्फी स्पॉट होता.

आमचे सीटीएमएम सदस्य, रिअल्टर श्री. अभिजित वग्गा यांनी दिलेल्या उदार देणगीसाठी त्यांचे खूप खूप आभार आणि आम्हाला आशा आहे की भविष्यात आमच्या प्रायोजकांकडून सतत सहकार्य मिळेल. तसेच कार्यक्रमादरम्यान साइन अप केलेल्या आणि मदत करणाऱ्या स्वयंसेवकांचे आभार सौ. स्वरा सावरकर तसेच श्री. महादू कुरकुटे यांचे आभार. कु. शार्वी कुलकर्णीने रेजिस्ट्रेशन साठी मदत केली त्याबद्दल तिचे विशेष कौतुक. कार्यक्रमाला CT राज्य प्रतिनिधी श्री. जॉन पिस्कोपो यांनी दिलेली भेट देखील विशेष उल्लेख करण्यासारखी आहे. सर्व सहभागींचे खूप खूप आभार.

## सर्व विजेत्यांचे मनःपुर्वक अभिनंदन!



विजेते अनुक्रमे पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकानुसार:

पुरुष गट - अरविंद सावंत, राजेश थिगळे, शैलेंद्र सावंत
महिला गट - ईश्वरी चिटणीस, चारू सावंत, तान्या बिसेन
तरुण - ओम सचदेव, दिव्यांश रघुवंशी, आराध्या सावरकर

असे आगळे वेगळे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मंडळाला स्वयंसेवक, प्रायोजक आणि प्रेक्षकांचा उत्स्फुर्त सहभाग हवा असतो म्हणून कृपया तुम्हाला या पैकी कशातही सहभाग घ्ययचा असल्यास किंवा काही प्रश्न असल्यास ctmmkarya@gmail.com वर आमच्याशी संपर्क साधा. वार्षिक सदस्यत्व, मराठी शाळा आणि आगामी कार्यक्रमांच्या माहितीसाठी CTMM.org ला भेट द्या.

हे सर्व उपक्रम अर्थातच अतिशय विविध कलागुणांनी परिपूर्ण अशा कार्यकारिणी सदस्यांशिवाय शक्य नाही. जे स्वतः चा बराच वेळ देऊन तुम्हासर्वांपर्यंत दर्जेदार कार्यक्रम पोहोचवण्यासाठी कार्यरत असतात. आणि मी या ईसी कुटुंबाचा एक भाग आहे याचा मला आनंद होतो. मंडळ आपलच आहे… तुम्हा आम्हा सर्वांच आहे… आणि आपल्या भावी पिढीचं आहे!

**- स्नेहा सुर्यवंशी**

उपाध्यक्ष,
कनेटिकट महाराष्ट्र मंडळ

# CTMM क्रिकेट प्रतियोगिता

Glastonbury च्या Addision पार्क मध्ये  CTMM आयोजित कनेक्टीकट प्रिमियर लिग चे प्रथम सत्र अतिशय उत्साहात व दिमाखात पार पडले. संघ जमविण्यापासून ते सामन्या आधीचे शाब्दिक चकमकींचे व्हिडीयो यांनी सर्वांच्या उत्कंठेला शिगेपर्यंत पोहोचवले होते.

या क्रिकेट स्पर्धेत ८ संघ सामील झाले होते, प्रत्येक संघात ३ पुरूष व ३ स्त्रीया होत्या. ही एक बॉक्स टाईपची स्पर्धा होती. संघाच्या कर्णधार स्त्रीया च होत्या.

स्त्रीयांनी अत्युत्तम क्रिकेट चे प्रदर्शन केले. पुरुषांपेक्षा जास्ती उत्साह स्त्रीयांमध्येच आढळून आला. CTGT Stars व CTGT warriors हे संघ विजेते ठरले.

आशिष साबडे व मोनिका मित्तल ह्यांना उत्तम फलंदाज, तसेच नितिश पंडीत व चारू सावंत ह्यांना उत्तम गोलंदाज म्हणून गौरविण्यात आले.

महादू कुरकुटे ह्यांनी अतिशय काटेकोरपणे पंचाची भुमिका बजावली.

शाल्मली गांधी ह्यांना लावलेल्या वडापावच्या स्टॉल मुळे अगदी भारतात खेळत असल्याचा भास झाला.

पुढील सत्र लवकरच जाहिर होईल अशी आशा आहे.

**- अमेय टुमणे**

# गणपती





CTMM चा गणेशोत्सव मोठ्या थाटामाटात, ढोल ताशाच्या जल्लोषात 01 ऑक्टोबर 2023 ला साजरा झाला. "गणपती बाप्पा मोरया" च्या जयघोषाने अवघे वातावरण गाजले होते. CTMM EC च्या सर्व कार्यकारी मंडळाने गणेशोत्सवाची कंबर कसून तयारी केली होती. कार्यक्रमाची उत्साह पूर्ण सुरुवात CTMM नादब्रम्ह च्या ढोल ताशा पथकाच्या बाप्पांच्या आगमन मिरवणुकीने झाली. नादब्रम्ह च्या ढोल ताशा च्या गजरात सर्वांचे पाय थिरकले. त्यानंतर मंगलमय वातावरणात श्रींची प्रतिष्ठापना आणि आरती झाली. CTMM च्या सुगरणीच्या हातचे अतिशय चवदार जेवण करून पुढील करमणुकीच्या कार्यक्रमास सुरुवात झाली. सी टी एम एम इ सी च्या बहारदार मंगळागौर नृत्याने कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यानंतर CT मराठी शाळा च्या चिमुकल्या मुलांनी अष्टविनायकाचा महिमा ह्या गाण्यावरती नृत्य रुपी कथा सादर केली. विशेष म्हणजे हे नृत्य लहान मुलांच्या अष्टविनायका गाण्यावरती प्रत्यक्ष सादरीकरण होते. लहान मुलांचे गाणे व नृत्य पाहून प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले व टाळ्यांच्या कडकडाटात लहानग्यांचे भरपूर कौतुक केले. कु. सारा गिराच हिला स्केटिंग मधल्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल सी टी एम एम गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. यावर्षी सी टी एम एम कार्यकारिणी मधील एक हिरा गमावला. गौतम नाईक यांच्या अकस्मिक निधनाने सी टी एम एम वरती शोककळा पसरली. या कार्यक्रमाच्या रूपाने सी टी एम एम ने गौतम दिलेल्या योगदानासाठी मरणोत्तर गौरव पुरस्कार दिला व त्यांना श्रद्धांजली वाहिली. सी टी एम एम च्या काही गुणी व हौशी कलाकारांनी दोन एकांकिका सादर केल्या व प्रेक्षकांची वाहवा मिळवली. तसेच सी टी एम एम च्या काही उत्साही नृत्यांगनांनी गणेशोत्सवा संबंधी दोन नृत्याविष्कार सादर करून उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. त्यानंतर CTMM तर्फे आयोजित कनेटिकट प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. आणि कुठलाही कार्यक्रम उत्साही स्वयंसेवकांशिवाय पूर्ण होत नाही अशा स्वयंसेवकांचा गौरव करण्यात आला. अशा उत्साह पूर्ण वातावरणात CTMM च्या गणेशोत्सवाची सांगता झाली.

**- वैभवी पंडित**

# कनेटिकट मराठी शाळा
# २०२२-२३ वार्षिक अहवाल

## दीपम ठवळी, नुपूर कुलकर्णी

नमस्कार मित्रमैत्रिणींनो! आपल्या मराठी शाळेचे नाव आवर्जून घेतले जाते ते 'चांगलं काम करतात, उत्तम नाव आहे' वगैरे अशा त्रोटक आणि मोघम वाक्यांतूनच. पण त्या छोट्या वाक्यांमागे असलेले खरे काम प्रचंड असते. आपली शाळा नक्की काय करतात हे सविस्तर समजले तर खऱ्या अर्थाने अशा दिपगृह मानल्या जाणाऱ्या शाळांकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन बदलेल व त्यांच्या कार्याला मनापासून समजून उमजून दाद देता येईल ह्या भावनेतून हा कनेटिकट मराठी शाळेचा 2021-22 चा वार्षिक अहवाल सादर करत आहोत.

'हसत खेळत मराठी शिकूया' हे ब्रीदवाक्य डोळ्यांसमोर ठेवून मी आणि नुपूर कुलकर्णी हिने शाळेचा कारभार नितीन आणि स्नेहा कोरगावकर ह्यांच्याकडून २०२० मध्ये स्वीकारला, आणि आमचे काम सुरु केले. शाळेचे मुख्य उद्दिष्टे मुलांमध्ये, विशेषतः जे इथेच अमेरिकेत जन्मले आणि वाढले अशा मुलांमध्ये मराठी भाषेची गोडी निर्माण करणे, इतरांशी (आजी,आजोबा) मराठीतुन संवाद साधणे, मराठी भाषा बोलणे, वाचणे, लिहिणे व भाषेचे आकलन होणे, इतर कुटुंबियांबरोबर मराठी कार्यक्रमांचा आस्वाद घेता येणे ही आहेत. त्याकरिता आम्ही शाळेत मुलांना खेळ खेळत, त्यांच्या कलाकलाने शिकवायला लागलो. त्याकरिता आम्ही  विविध मराठी खेळ, भेंड्या, गाणी, कविता, कोडी ह्यातून मुलांना मराठी ची गोडी लावण्यात यशस्वी झालो.

कनेटिकट मराठी शाळेत द्विभाषिक पद्धती देखील राबवली आहे. किलबिल वर्गापासून पाचवी पर्यंत विद्यार्थ्यांना द्विभाषिक पद्धतीने शिकवले जात आहे. विषय शिकवताना मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांचा वापर केला जातो. विषयाची संकल्पना स्पष्ट करताना मराठीचाच वापर केला जातो आणि प्रत्येक विषयातील इंग्रजी पारिभाषिक शब्दांची (terminology) ओळख इंग्रजीतूनही करून दिली जाते. यामुळे इंग्रजी पारिभाषिक शब्दांशी मुलांची मैत्री तर होतेच, पण मराठीतल्या व्यवहारातून लुप्त होत चाललेल्या शब्दांचीही ओळख करून दिली जाते.

त्याचबरोबर वर्षभरात येणारे मराठी सण व उत्सव ह्यातून आपली संस्कृती जपता यावी, त्यांना सणवार भारतीय पद्धतीने साजरे करता यावेत, यासाठी आपले सगळे सण (संक्रांत, गुढीपाडवा, गणपती, दसरा आणि दिवाळी) शाळेत साजरे केले जातात. या सणांचे महत्त्व, त्यामागील पौराणिक कथा, सामाजिक महत्त्व विद्यार्थ्यांना आवर्जून सांगितले जाते.

वर्षाअखेरीस शाळेच्या परीक्षा होतात. तसेच बृहन महाराष्ट्र मंडळाच्या वार्षिक परीक्षेतील विध्यार्थ्यांना भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठातून मूल्यमापन आणि प्रमाणपत्र दिले जाते.

आमची मराठी शाळा झपाट्याने मोठी होत आहे. २०२२-२३ या शैक्षणिक वर्षामध्ये जवळपास ७२ विद्यार्थी पटावर आहेत. १३ शिक्षक स्वयंसेवक म्हणून आपला वेळ देतात, त्यांचे खूप कौतुक आणि आभार. शाळेचे स्वतःचे एक सुसज्ज ग्रंथालयदेखील आहे. मुलांना वाचनाची गोडी लागावी म्हणून गोष्टीची, अथवा अभ्यासाची पुस्तके शाळेने उपलब्ध करून दिली आहेत. आज आमच्या ग्रंथालयात जवळजवळ १५० पेक्षा जास्त पुस्तके उपलब्ध आहेत. फिरते ग्रंथालय वर्गा-वर्गातून फिरून मुलांना पुस्तके घेऊन जाण्यासाठी उद्युक्त करते.

## मराठी शाळा कार्यक्रमांचा आढावा

- गेल्यावर्षी शाळेकडून "श्री रामायणजीवन चिंतन कथा पाठांतर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, ह्या स्पर्धेला भरगोस प्रतिसाद मुलांनी दिला. मराठीतून असलेले उतारे पाठ करून अस्खलितपणे हावभावासहित सादर करावयाचे होते , त्यात सगळ्यांनीच बाजी मारली.
- HSS तर्फे फेब्रुवारी मध्ये सूर्यनमस्काराचे प्रात्यक्षिके मुलांकरिता सादर करण्यात आली, ज्यात शाळेतील सगळ्याच मुलांनी सहभाग घेतला होता
- CTMM च्या गुढीपाडव्याच्या कार्यक्रमात मराठी शाळेतील मुलांनी 'महाराष्ट्राची लोकधारा ' ह्या विषयावर गायन स स्पर्धेत भाग घेतला होता.
- त्याच कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी 'महाराष्ट्रातील संतांचा महिमा' ही नाटुकली सादर केली.
- ४ मार्च ला आम्ही शाळेत मराठी भाषा दिवस साजरा केला.
- गुढीपाडव्याला सगळी मुले भारतीय पेहेराव करून शाळेत गुढी घेऊन आली होती.
- त्यानंतर आली शाळेचे उन्हाळी सहल. त्याकरिता सगळेच जण आतुर असतात, अशी आमची सहल आम्ही Wickham पार्क मध्ये खुपधमाल, खाणेपिणे, गप्पा-गोष्टी, खेळ खेळत साजरी केली.

- CTMM च्या २०२३ च्या गणपती कार्यक्रमात शाळेतील मुलांनी 'अष्टविनायक तुझा महिमा' ह्याचे अप्रतीम सादरीकरण केले.

पुढे येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये देखील शाळेतील विद्यार्थी भाग घेतील हि अपेक्षा मी करते.

आज एक मराठी शाळेची समन्वयक म्हणून हा अहवाल लिहिताना आणि मराठी शाळेत आम्ही नक्की काय करतो हे तुम्हा सर्वांना सांगताना खूप अभिमान वाटतो. मी गेली पाच सहा वर्षे कनेटिकट मराठी शाळेत शिकवत आहे. माझा प्रवास किलबिल वर्गापासून ते शाळेच्या समन्वयकां पर्यंतचा. मुलांना शिकवताना मलासुद्धा खूप काही शिकायला मिळाले. या मुलांशी आणि या शाळेशी माझे ऋणानुबंध जुळले गेले आहेत. अशा या मराठी शाळेचा आम्हा सगळ्यांनाच खूप अभिमान आहे.

**- दीपम ठवळी, नुपूर कुलकर्णी**



# गजरा

## पुनःश्च गजरा

साहित्य हा मराठी अस्मितेचा एक अविभाज्य पैलू आहे. मराठी माणूस एक चोखंदळ वाचक असतो. कविता, कादंबरी, साप्ताहिक, दिवाळी अंक ते अगदी WhatsApp आणि ब्लॉग पर्यंत हि वाचन संस्कृती आपण जपली आहे. मराठी दिवाळी, दिवाळी अंकाशिवाय साजरी होऊच शकत नाही. CTMM आपल्या कार्येक्रमत विविध कलागुणांना वाव देते, मग साहित्य कसे मागे राहील? हाच मानस ठेऊन २०२३-२४ च्या कार्यकारिणी मंडळाने CTMM चे लाडके नियत्कालित गजरा पुनःश्च घेऊन यायचे ठरवले.

२०२३ चा अंक Resilience, म्हणजेच नव्या उमेदीने संकटांवर मात करण्याची वृत्ती, ह्या विषयावर करायचे ठरले. आपल्या आयुष्यात अनेक अडचणी, निराशा, पराभव येतात. पण आपण सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन, आयुष्यावर प्रेम करत आणि कमालीच्या जिद्दीने ह्या संकटांवर मात करतो. मातृभूमी पासून लांब राहणाऱ्या आपल्या सारख्यांना कदाचित हे जास्त जाणवते.

या अंकामध्ये चिमुकल्यांपासून ते दिग्गज अनुभवी मंडळींनी आपणहून आम्हाला लेख, कविता, चित्रं दिली. आपला सर्वांचा प्रतिसाद बघून आमचा आनंद आणि पुढच्या वर्षासाठीचा उत्साह नक्कीच द्विगुणित झला आहे.

आम्हाला खात्री आहे, हा आमच्या कार्यकारिणीचा पहिला प्रयत्न त्यातल्या गुणदोषांसकट मोठ्या मानाने आपण स्वीकाराल आणि त्याचा आस्वाद घ्याल!

# प्रथम तुज पाहता

## सुधीर ओक



लेखाचं शीर्षक वाचून तुमच्यापैकी काहींना - कदाचित बऱ्याच जणांना, हे कुण्या दोन जिवांच्या पहिल्या भेटीचं वर्णन वगैरे आहे असं वाटलं असेल. “First impression is a lasting impressions” असं जरी म्हटलं असतं तरी काही काळानंतर वस्तुस्थिती त्यापेक्षा बरीच वेगळी आहे अशी जाणीव होते देखील.

मराठी भाषेत, “एक गोरी अन हजार दोष चोरी” अशी एक म्हण आहे. कारणं काही का असेनात, पण आपल्याकडे गोऱ्या रंगाचं कौतुक जरा जास्तच आहे. त्यामुळे एखादी गोरी-गोमटी व्यक्ती दिसली की आपोआपच थोडं – गरज नसताना – positive impression होतं. कदाचित त्यामुळेच अशी म्हण पडली असेल.

First impression कसंही होवो, त्याला काळाच्या आणि वाढवलेल्या परिचयाच्या कसोटीवर तावून-सुलाखून घेऊन मगच त्या impression चं मतात रूपांतर करून घेणं हे खूप महत्वाचं आहे. मग ती प्रत्यक्ष भेट असो, WhatsApp मधली पोस्ट असो किंवा एखाद्या चित्रपटाचा trailer असो.  नाहीतर “काय आपण चुना लावून घेतला आपल्यालाच”, “How could I be so stupid” अशा प्रकारचे कठोर आत्मपरीक्षण करून घ्यायची वेळा यायची!

याचा अर्थ प्रथमदर्शनी प्रेम, पहिल्यांदा आवडलेली व्यक्ती खरोखरीच चांगली असणे असं होणार नाहीच असं मुळीच नाही.  आपण सिनेमा नाटक पाहतो, ते आवडतं, नायक/नायिका अगदी puppy crush होण्याइतके आवडले तरी ते फारसं मनावर घ्यायचं नाही कारण त्यांचा आणि आपला वास्तवात फारसा संबंध येणारही नाही.  पण एखादा माणूस भेटला, आवडला म्हणून आपण काही त्याला पाकीटातले पैसे लगेच उसने देणार नाही. पहिल्या भेटीनंतर पुढे आणखी काही निर्णय घ्यायचे असतील तर मात्र समर्थ रामदास यांनी केलेला “तिसरे ते सावधपण सर्वांविषयी” हा उपदेश विसरू नये.

“दिसतं तसं नसतं, म्हणून जग फसतं” असं आपण म्हणतो.  पण आपण जसे नसतो, आणि तरीही जगाने आपल्याला जसं पाहावं असं आपल्याला वाटत असतं, तसे आपण जगाला दिसावं म्हणून जगाला आणि पर्यायाने स्वत:लाही फसवणं हा मनुष्य स्वभावाचा एक भागच आहे, नाही का?

त्यापेक्षा जगाने आपल्याला जसं पाहावं असं आपल्याला वाटतं, तसंच बनण्याचा आपण प्रयत्न करावा हेच जास्त श्रेयस्कर ठरेल. तसं झालं तर “हे मला आधी वाटलं नव्हतं” असं म्हणण्याची वेळच येणार नाही, आणि First impression हेच last आणि lasting impression होईल आणि सगळ्यांचंच जीवन छान-छान, गोड-गोड होईल.

**- सुधीर ओक**

# नाच मेरी जान

**वर्षा देशमुख**

कधी कधी फार साधी वाटणारी गोष्टही आपल्याला बरंच काही मिळवून देते, फक्त जिद्द हवी. माघार घेण्याची वृत्ती नसलेली लोकं पुढे येणाऱ्या अडथळ्यांवर निःसंकोचपणे मात करतात. काहीही कारणे न देता समोर आलेली गोष्ट ही आपल्यासाठीच आहे आणि हे आपण करून दाखवायचंच हेच जणू आम्हां सहा जणींच्या ध्यानीमनी होतं, म्हणून तर फक्त, हो फक्त सहाच प्रॅक्टिस नंतर आम्ही फायनल ऑडिशन व्हिडीओ बनवून 'अब जो होगा, देखा जायेगा' म्हणत पाठवून दिला. वेळ फार कमी होता, त्यात आम्ही सहाच्या सहा जणी इतक्या लांब लांब होतो राहायला कि प्रवासातच अर्धमेल्या व्हायचो. नुसत्या सहाजणींचं तर सोडाच आमची कोरिओग्राफर 'स्टॅम्फर्ड' ला राहात होती.

तर झालं असं कि बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संमेलनात यावेळी डान्स कॉम्पिटिशन सुद्धा होणार आहेत, हे कळल्यानंतर मी आणि कनेटिकट मराठी मंडळाची कमिटी मेंबर वैभवी, दोघींनी एकमेकींना



फोन करून यात आपण परफॉर्म करायचं असं ठरवून टाकलं. कॉम्पिटिशनसाठी ऑडिशन व्हिडीओ एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात पाठवायचा होता आणि आम्ही सुरुवात मार्च च्या पहिल्या आठवड्यात केली. सुरुवात म्हणजे अगदी शून्यातून सुरुवात होती. कॉम्पिटिशन आहे, वेळ कमी आहे याचा सारासार विचार करून आम्ही दोघीनी प्रॉपर डांस करणाऱ्या मुलीच निवडायच्या असा निर्णय घेऊन साऊथ विंडसरची कल्याणी पंडित, सिम्स्बरीची वैदेही परांजपे, ग्लॅस्टनबेरीची सीमा वाटवे, ह्याम्डनची मेधा केळकर यांना सामील करून घेतलं. वैभवी विल्टनची आणि मी रॉकी हिल. अशा सहा वेगवेगळ्या शहरातल्या सहा जणी. "नाच मेरी जान" हेच नाव द्यावंसं वाटलं आमच्या WhatsApp ग्रुपला. का कोण जाणे, पण आम्ही सगळ्याच जाम हौशी होतो नाचायची हौस दुसरं काय.

आता गृप तर तयार झाला, पण पुढची कितीतरी दिव्ये पार पाडायची होती. गाणं कोणतं घ्यायचं ? कोरिओग्राफर, कॉस्ट्यूम्स, प्रॅक्टिस डेट्स, ऑडिशन व्हिडीओ कुठे घ्यायचं, प्रोफेशनल शूट करायचं कि नॉर्मल? कोणत्या डेट्स ला करायचा, सगळ्याजणी कोणत्या दिवशी हजर राहू शकतात. एक ना दोन, असंख्य प्रश्न होते, पण सगळ्याच जाम चिकट होतो आणि चिवट पण. वैभवीने, चारुचं नाव सुचवलं, कोरिओग्राफर म्हणून. दोन दिवसांच्या अथक बडबडीनंतर अजय अतुलची, तीन मराठी हाय बिट्स ची गाणी ठरली, त्याचं एडिटिंग काम कल्याणीने हाती घेतलं. BMM साठी डान्स रेजिस्ट्रेशन आणि ज्या काही मीटिंग्झ वगैरे व्हायच्या ते सगळं वैभवीने बघितलं. वैभवीच्या ओळखीने कॉस्ट्यूम्स सुद्धा अवघ्या पंधरा दिवसात मिळून गेले.

आता महत्वाचा मुद्दा, प्रॅक्टिसेस. एकत्र येऊन प्रॅक्टिस करणं हे खूपच मोठ्ठं चॅलेंज होतं आमच्या पुढे. वैभवी आणि मेधा तर आमच्यापासून अगदी अवघ्या ४५ मिनिटांच्या अंतरावर, गाडीने बरका ! मी, कल्याणी, सीमा, वैदेही आम्ही एकमेकींपासून त्यातल्या त्यात २० मिनिटांवर होतो. सगळ्यांच्या नोकऱ्या, घर, मुलं, त्यांचे क्लासेस, सगळंच. सगळ्यांच्या सगळ्याच वेळा सांभाळून आम्हाला हे करायचंच होतं. एक खूप छान गोष्ट शिकलो आम्ही एकमेकींकडून कि जे मनात आहे, जे करायचंच आहे त्यासाठी सगळं सांभाळायचं आणि वेळ द्यायचाच. ही आम्हां सहा जणींमधली कॉमन गोष्ट होती. मग आम्ही संध्याकाळच्या आपापल्या वेळांचा सुवर्णमध्य साधून एक वेळ ठरवली. चारुकडे दोन विझिट केल्या. ती स्टॅम्फर्डला असल्याने जाणंयेणं हे अडीच तासांचं पकडून प्रॅक्टिस दोन तास, असं गणित करून आम्ही वीकेंड ला कोरिओग्राफीचं काम उरकून घेतलं. आम्ही पोहोचण्यापूर्वीच चारू सगळी कोरिओग्राफी तयार ठेवायची. असे दोन शनिवार आम्ही स्टॅम्फर्ड वाऱ्या केल्या आणि नंतर च्या चार प्रॅक्टिस आम्ही सिम्स्बरी, रॉकी हिल, ग्लॅस्टनबरी, ह्यामडेन आणि विल्टन या ठिकाणी भेटून केल्या. प्रॅक्टिसेस थोड्या आनंददायी व्हाव्यात म्हणून आम्ही ड्रेस कलर कोड ठेवायचो, या प्रॅक्टिस ला सगळ्यांनी लाल तर पुढच्या प्रॅक्टिसला पिवळं..

सीमाच्या घरची प्रॅक्टिस म्हणजे पहाटे चार पर्यंत जागून केलेलं स्लीपोव्हर, वैभवीच्या घरी खाल्लेला गरम गरम सांबर भात आणि गणपती पुढे काढलेला तो लकी फोटो, वैदेहीच्या हातची पावभाजी आणि मागच्या अंगणातली रील, मेधाच्या घरची प्रॅक्टिस रात्री ८.३० ला तिथे पोहोचून १०.३० ला परत निघालेलो, घरी १२ च्या आसपास पोहोचलो होतो, जायचो एका गाडीने, सगळ्यांना पिकअप करत करत. पुण्याच्या शेअर ऑटो आठवायच्या. ठरलेले driver म्हणजे सीमा आणि वैदेही, आम्ही आपल्या मागच्या सिटा सांभाळायचो.

डान्स गृपचं बारसं सुद्धा आम्ही मिळून केलं पण आम्हाला फार जवळचं तर आमचं वॉटसप गृपचंच नाव वाटायचं , "नाच मेरी जान". आमच्या डांस गृपचं नाव "नृत्यरागिणी". वैदेही, मस्त सहा प्लेन टीशर्ट्स घेऊन त्याच्या पाठीवर 'नृत्यरागिणी' लिहून आम्हां सगळ्यांसाठी घेऊन आलेली. फार कमी वेळेत आम्ही फार क्लोज झालो एकमेकींशी. प्रॅक्टिस दरम्यान भरपूर गप्पा, भरपूर गॉसिप, भरपूर खादाडी व्हायची.

कॉस्ट्यूम्स चा तर लै मोठ्ठा किस्सा आहे. थोडक्यात सांगते, आम्ही जातीने बायका, त्यामुळे मापे देताना इतकी कंजूसी करून दिली कि आमचे इंडियाहुन शिवून आलेले कपडे अंगात चढेचनात. मग पुन्हा मारामारी त्यावर. धम्माल होती नुसती अशाप्रकारे आम्ही मोजून सहा प्रॅक्टिसेस केल्या. त्यातल्या दोन तर कोरिओग्राफी शिकण्यात गेलेल्या म्हणजे मोजून ४ प्रॅक्टिस मध्ये आम्ही फुल्ल कॉन्फिडन्स ने डान्स ऑडिशन साठी व्हीडिओ पाठवून दिला. सिलेक्शन होईल कि नाही हा विचारच नव्हता केला मात्र जिंकण्याच्या दृष्टीनेच पावलं उचलून मेहेनत मात्र खूप केलेली. घरच्यांची खूपच मदत झाली, मुलांचा, नवऱ्याचा सपोर्ट सगळ्यांना होता त्यामुळे BMM मध्ये आमच्या डांस ला मिळालेलं पहिले बक्षिस म्हणजे आमच्या माणसांनी आम्हाला दिलेल्या पाठबळाचंच प्रतीक आहे.


फक्त घरचेच नाही तर कॉम्पिटिशन हॉल मध्ये CTMM च्या कमिटी मेंबर्स आणि CTMM च्या बऱ्याच सभासदांनी हजेरी लावून डांसच्या वेळी इतका जयघोष केला कि अख्खा हॉल दणाणून सोडलेला. कनेटिकटचाच आवाज होता तिथे फक्त. त्यावेळच्या CTMM प्रेसिडेंट आणि कमिटी मेंबर्स, यांनी खूप सपोर्ट केला. पहिलं बक्षिस जाहीर झाल्यानंतर, प्रत्येक चेहेऱ्यावरचा आनंद आम्ही जवळून पाहिला. तिथे सगळेच आपले आहेत ही जाणीव, तेव्हा प्रकर्षाने झाली. चारू सतत आमच्यासोबत होती. "आईच्या सावलीत असल्याचा भास म्हणजे चारुचा सहवास " यापेक्षा वेगळं काही सुचत नाहीये मला तिच्याबद्दल लिहिताना. वैभवीचा खूप जास्त वाटा आहे यात. सुरुवातीपासूनच तिने हे इतकं मनावर घेऊन अखेरपर्यंत निभावलं. प्रत्येकीच्या खारीच्या वाट्यात तिचा वाटा थोडा मोठा होता. बाकी आम्ही आणि आमच्या मुलींचे जोक्स अजूनही आठवले कि चेहऱ्यावर हसू आल्याशिवाय राहात नाही.

BMM ने खूप छान अनुभव दिला आणि "नाच मेरी जान" ने गोड मैत्रिणी . जिद्दीने ठरवलं तर कुठलाच अडथळा येत नाही आणि आलाच तरी त्यावर हमखास मात करून पुढे जाता येतं, यश आपली तिथे वाट बघत असतं.

**- वर्षा देशमुख**

# शब्दकोडे

विनोद पाटील




**आडवे शब्द**

१. लक्षाचा एक चित्रपट, बजरंगाची ......
३. तुकोबांच्या रचना
५. अज्ञानी, अडाणी, अर्धवट
७. अमेरिका रन्स ऑन डँकिंन, मुंबई रन्स ऑन......
९. बाकरवडी खावी तर यांची
१०. ताक बनवण्याचे साधन
१२. ब्रह्मदेवाचे आसन
१४. पुणेकरांची आवडती मस्तानी
१५. हायेस्ट ग्रॉसिंग मराठी चित्रपट
१६. वडील बंधू
१८. आकार मात्रा
२०. मुंबईतील एक मध्यवर्ती ठिकाण
२२. व्यंकटेश माडगूळकर लिखित, अमोल पालेकर दिग्दर्शित
२४. Delightful, Pleasant in मराठी
२६. कायद्याचं बोला, दे धक्का फेम
२७. अजंठा, वेरूळ
२८. रायगडावरील कडेलोट देण्याचे ठिकाण
२९. ‘सही रे सही’ नाटकातलं एक पात्र

**उभे शब्द**

१. .....काळजात घुसली
२. गजरा ची थीम
४. महाराष्ट्रातील एक धबधबा, सह्याद्रीतील एक हिल स्टेशन
६. CTMM चा हरवलेला एक आधारस्तंभ
८. नवरा (लग्नातला)
११. CTMM चे खजिनदार, उच्चांक
१३. क्रिकेट मधील एक फटका
१४. एक चित्रपट, तानाजी मालुसरे
१७. Pressure मराठीत
१९. सुप्रसिद्ध, प्रख्यात
२१. थकवा
२३. आनंद यादव लिखित, रवी जाधव दिग्दर्शित
२५. कवितेतला एक अलंकार

# बाईपण भारी देवा !!

## आणि "त्या" दिवसात आता नवीन दृष्टिकोन हवा !!

### ज्योत्स्ना कुरकुटे

नवरात्रीचा उत्सव  संपूर्ण भारतभरच नाही तर जगभर वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. या सणाचा प्रथम उद्देश स्त्री शक्तीचा गौरव हा आहे. एक शक्तीपीठ गुवाहाटी इथे कामाख्या देवीचं आहे. धार्मिक मान्यतेनुसार इथे देवीचा योनी भाग असल्यामुळे त्याचीच पूजा केली जाते आणि देवीची पाळी येते असे मानले जाते. हे विशेषतः सांगण्याचे कारण म्हणजे एका ठिकाणी समाजात  या गोष्टीला पुजले जाते तर काही ठिकाणी देवाला स्पर्शच करायचा नाही अशी समज आहे. इतकी विसंगता का ?



तुम्ही म्हणाल आपण तर तेच करणार जे वर्षानु वर्षे पिढ्यान पिढ्या चालत आले आहे. जस की देवाला स्पर्श न करण, पूजेचा प्रसाद न खाणे, पूजा न  करणे वगैरे वगैरे. पण प्रथम आपल्याला हे समजून घेणं गरजेचं आहे कि आपण आंधळेपणाने हे सगळं स्वीकारलं पाहिजे का? स्त्री खरंच अस्पृश्य आहे कि नाही हे समजून नको का घ्यायला?

मला सांगा पाळी (periods) म्हणजे नेमकी काय? ही तर एक नैसर्गिक क्रिया आहे. जेंव्हा स्त्रीच शरीर परिपक्व होत तेंव्हा ते दर महिन्याला एक विशेष तयारी करत असते दुसऱ्या जीवाला जन्म देण्यासाठी आणि जेंव्हा या तयारीनंतर शरीराला embryo मिळत नाही तेंव्हा हि तयारी शरीराबाहेर फेकली जाते आणि या सगळ्या क्रियेलाच मासिक पाळी म्हटले जाते.

मग हि नैसर्गिक क्रिया अस्पृश्य कशी? मला तर वाटते हि क्रिया खास स्त्री च्या शरीरात होते ते मानवी प्रजातीला पुढे नेण्यासाठी. मग तर ही सर्वात पवित्र मानायला पाहिजे. पण आपण निसर्गाच्या या चक्राला पण आपल्या मनानुसार वळवतो. वाकवतो. तारखा लांबवतो. आणि मग.. येणारे ताण, तणाव, शारीरिक आजार, मानसिक रोग भोग.. भोगतो. प्रत्येक गोष्टी ची वेळ ठरलेली असते. वेग ठरलेला असतो.

अजूनही काही स्त्रिया ते पाच दिवस देवाला स्पर्श करत नाहीत. त्यांच्या मनात भीती असते की असे काही केले तर माझ्यामुळे काहीतरी विपरीत घडेल आणि माझा कुटुंबावर संकट येईल. इतकी भीती या नैसर्गिक प्रक्रियेविषयी का बाळगली जातीये? देवाला हे सगळे चालत नाही असे मानले जाते कि जे देवानेच दिले आहे त्यालाच का नाही चालणार?

पूर्वी कदाचित या काळात स्त्री ला आराम मिळावा म्हणून या प्रथा पाळल्या जात होत्या. पण आजही याचा चुकीचा अर्थ घेतला जातोय.

जसा समाज वेगवेगळ्या क्षेत्रात पुढे गेला आहे तसे याही विचारधारणीला वेगळ्या पद्धतीने बघण्याची गरज नाही का? आपण सगळ्यांनी मिळून यावर विचार करण्याची गरज आहे. वैयक्तित पद्धतीने स्वतःच्या आचरणात बदल करण्याची गरज आहे. आपल्या पुढच्या पिढीला काय द्यायचे या विषयावर याचा विचार आपणच नको का करायला.

आपण स्त्री शक्तीला इतकं मानतो त्याची पूजा करतो मग तीच हे रूप आपल्यासाठी अस्पृश्य कस ?... विचार करा मैत्रिणींनो !!

**- ज्योत्स्ना कुरकुटे**

# Astrophotography

- by Hanif Girach



**Jupiter**

Cool facts: Jupiter is the fifth planet from the sun and the largest planet of our solar system. It is twice as massive as all other planets combined. This picture captures its Great Red Spot, that is a super storm raging for over 100 years and about the size of 1 Earth. The best times to view Jupiter in Connecticut is Sep through Dec in the evening sky and you can easily spot it as a bright shining object in the East/South-East sky.

Also read: Hubble space telescope recently captured a similar picture in Ultraviolet https://science.nasa.gov/missions/hubble/hubble-provides-unique-ultraviolet-view-of-jupiter/



## Saturn

Cool facts: Saturn is the sixth planet from the sun and the least dense planet of our solar system. The largest moon of Saturn is Titan and it is bigger than the planet Mercury. This picture captures its blanket of clouds that appear as faint stripes in many different shades of yellow, brown, and gray. It also shows the rings of Saturn, that extend 175,000 miles from the planet, with a distinctive gap between the rings called thr Cassini division. The best times to view Saturn in Connecticut is Sep through Dec in the South East/South part of evening sky. It appears much fainter than Jupiter due to its further distance and smaller size and as such hard to spot in a city area without a pair of binoculars.

Also read : Additional Saturn facts
https://science.nasa.gov/saturn/facts/

# माझा गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचा प्रवास

## प्रीति गुंडपवार

लहानपणी मला फुलांचं नेहमीच आकर्षण असायचं, खरं तर मी फ़ुलवेडी होते. बकुळ, बुचाची सुवासिक फुले गोळा करायला मी थेट शाळेमधूनच जाई. मला या महाकाय झाडांखाली फुलं पडताच धावत जाऊन सर्वां अगोदर गोळा करण्यात खुप आनंद मिळत असे.



दोन घटनांमध्ये मी ते गोळा करताना इतके हरवले होते की मी माझ्या पालकांना सांगितले नाही म्हणून ते मला सर्वत्र शोधत होते आणि एकदा तर पोलीस तक्रार दाखल करावी लागली होती. फुलं काढायला कुठेही आवडायचं, रांगोळीच्या रूपात असो नाहीतर कागदावर. फुलांची ग्रीटिंग कार्ड पण खूप गोळा करत असे. त्या काळी दिवाळीलाच लोक ग्रीटिंग कार्ड्स पाठवायचे आणि त्याचं फारच अप्रूप  असायचं.



या फुलांच्या रांगोळ्यांमुळे मला रांगोळीची कला आवडू लागली आणि मोठ्या-मोठ्या  रांगोळ्या काढायला लागले. जेव्हा मी १२ वर्षांची होते, तेव्हा माझा एका मोठ्या रांगोळी स्पर्धेत पहिला नंबर आला आणि प्रसिद्ध मराठी अभिनेते 'राहुल सोलापूरकर' यांचा हस्ते पुरस्कार मिळाला. त्यानंतर मी  रांगोळ्या काढत राहिले. खास करून मला संस्कार भारतीच्या सुबक, सुंदर, मोठ्या रांगोळ्या खूपच आवडू लागल्या.



माझे लग्न झाल्यावर, सासरी माझ्या पहिल्या दिवाळी भेटीत मी पुन्हा एक मोठी फुलांची रांगोळी काढली आणि दिव्यांनी सजवली. सर्वांना ते आवडले आणि स्थानिक वृत्तपत्रातही ते प्रसिद्ध झाले.

अमेरिकेमधे आल्या नंतर मला इथे चुकले चुकले वाटू लागले म्हणून

मी रांगोळ्या खडूने काढायला सुरुवात केली. साधारणपणे मी होळीच्या दिवशी मोठ्या फुलांच्या रांगोळ्या काढायला सुरुवात केली. ही माझी एका होळीची रांगोळी.

जेव्हा कोविड सुरू झाला तेव्हा सर्वजण ड्राईव्हवेवर चॉक आर्ट करून एकमेकांना उभारी देत होते. त्या वेळी मी माझ्यासह सर्वांना आनंद देण्यासाठी आमच्या घरासमोर एक मोठे फूल काढायचे ठरवले. तो वसंत ऋतूचा आगमनाचा काळ होता म्हणून त्याच्या स्वागतासाठीही ही रांगोळी होता.

ते 25X25 फूट छोटे रेखाचित्र काढल्यानंतर, मला या संबंधात काही गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड आहे की नाही हे पाहण्याची उत्सुकता होती आणि मला काहीही सापडले नाही म्हणून या विषयी विचारणा करण्यासाठी अर्ज केला. त्यांचे उत्तर आले की आमच्याकडे स्ट्रीट-आर्ट श्रेणी आहे आणि तुम्ही त्याला आव्हान देऊ शकता. त्यासाठी मी माझा अर्ज जून २०२१ मध्ये दाखल केला.

त्यानंतर मी नियमांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली आणि अनेक आवश्यकता पूर्ण करायच्या होत्या. त्या कश्या करायच्या आणि काय काय लागेल ह्याची यादी केली. सार्वजनिक रस्त्यावर काहीही काढण्यासाठी तुम्हाला परवानगी घेणे खूप महत्वाचे आणि आवश्यक होते.

मी आमच्या शहरातील विविध विभागांमध्ये गेले परंतु परवानगीसाठी निश्चित उत्तर मिळाले नाही म्हणून माझ्या शेजाऱ्याने शहरातील चर्चला विचारण्याचे सुचवले ज्यांच्याकडे पार्किंगची मोठी जागा आहे. मला त्यांच्याकडून परवानगी मिळाली आणि इव्हेंट सर्व्हेअरने ऐनवेळी सांगितले की तो मोजमाप करू शकत नाही. खूप तयारी नंतर हा कार्यक्रम रद्द करावा लागला.

त्यानंतर स्थळ, हवामान, साक्षीदारांची संख्या, सर्वेक्षकाची उपलब्धता आणि माझी उपलब्धता अश्या अनेक कारणांनी गेल्या 2 वर्षांत किमान 10 वेळा हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला आहे. हे पूर्ण करण्यासाठी अनेक घटक एकत्र यावे लागले.

मी गेल्या वर्षी आमच्या ड्राइव्हवेवर 10X15 फूट फ्रेममध्ये ट्रायल ड्रॉइंग केले आणि मुख्य कार्यक्रमाची आतुरतेने वाट पाहत होतो. त्यावरून मी किती खडू आणि किती वेळ लागेल याचा हिशोब केला. असे दिसते की मी सतत रेखांकन केले तर 16 तास लागतील. मुलांनी मला आवश्यक तो विश्रांतीचा वेळ जोडण्यास  सांगितला कारण शारीरिक ताकद आणि साक्षीदार मिळून सतत काम करणे अशक्य होते. ह्या सविस्तर अभ्यासावरून असे दिसले की, साधारण दोन दिवस आणि 16 साक्षीदार लागतील.

शेवटी 30 सप्टेंबर 2023 रोजी रेखांकन करण्याचे ठरले आणि 28 तारखेला हवामान चांगले दिसत नव्हते म्हणून मी 1 आणि 2 ऑक्टो रोजी ते करण्याचा निर्णय घेतला कारण हवामान योग्य दिसत होते आणि सुदैवाने सर्व साक्षीदार आणि सर्वेक्षक तयार होते.

या वेळी सुरक्षिततेसाठी मी साक्षीदार आणि एका अतिरिक्त सर्वेक्षकाची योजना आखली. मी दुप्पट खडू देखील ऑर्डर केले. मी पांढऱ्या खडूंबद्दल अधिक चिंतित होतो आणि त्यासाठी मी सर्व क्राफ्टच्या दुकानात गेले आणि अतिरिक्त पांढरे खडू गोळा केले.

या तयारीनंतर, आम्ही २९ सप्टेंबर रोजी आमच्या गावातील एव्हरग्रीन वॉकच्या ठिकाणी गेलो, ज्यासाठी आम्ही अधिकृत परवानगी घेतली आणि बोर्डर काढली. ज्या दिवशी 1 ऑक्टोबर रोजी कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होता, त्या दिवशी आम्ही 8:30 वाजता तेथे पोहोचलो आणि सर्व परिसर पॉवर वॉशने एका कर्मचाऱ्याने धुतला होता आणि तो 9 वाजे पर्यंत कोरडा होईल असे वाटले नाही. एव्हरग्रीन वॉकच्या अधिकारी आणि त्या व्यक्तीमध्ये किती वाजता रोड धुवायचा ह्याबद्दल काही



माझे 2438 sq.ft रेखाचित्र, मी बाजूला आराम करत आहे, हा फोटो दुपारी सगळे मोजमाप झाल्यावर काढला आहे.

गैरसमज झाला होता म्हणून त्याने सर्व क्षेत्र धुतले. मी हे सर्व पाहून रडायला लागले. आमच्या शहराच्या महापौर, जिने सार्वजनिक रस्त्याची परवानगी मिळवून दिली, ती कार्यक्रमाच्या उदघाटनाला आली होती. मी मग त्या वेळी तिला विचारले की मला माझ्या घराच्या अगदी समोर असलेल्या जागेत काढण्याची परवानगी मिळेल का? तिने पोलीस मुख्यालयाला पटकन फोन केला व विचारणा केली. ती म्हणाली जोपर्यंत तुम्ही कोणाचा रस्ता अडवत नाही तोपर्यंत काहीही समस्या येणार नाही.

आम्ही परत आलो आणि आमच्या घरासमोर बॉर्डर काढली. सुदैवाने कोणाचाही मार्ग न अडवता आयत उत्तम प्रकारे बसला. त्यानंतर मी चित्र काढायला सुरुवात केली, योजनेपेक्षा एक तास उशीर झाला होता.

साक्षीदारांना सोयीस्कर वाटावे म्हणून आम्ही त्यांच्यासाठी शेड लावली आणि खाण्या-पिण्याची व्यवस्था पण केली. मी आणि माझे यजमान, दोघांनी कामावरून सुट्टी घेतली. माझे पती सर्व रेकॉर्डिंग, फॉर्म आणि मला पाणी-अन्न देणे, मानसिक आधार देणे, प्रोत्साहीत करणे यासारख्या सर्व महत्वाच्या गोष्टींची काळजी घेत होते.

चित्रातील बर्फ काढल्यानंतर, अवाढव्य अश्या आकारामुळे पहिले झाड मोजणे कठीण होते आणि कल्पना करणे पण कठीण होते. माझा मुलगा जय याने मला ड्रोनद्वारे कुठे थांबायचे आणि सुरू करायचे हे ठरवण्यासाठी व ते वरतून कसे दिसेल हे दाखवून खूप मदत केली.

कार्यक्रम 1 ऑक्टोबर रोजी सकाळी 10:08 वाजता सुरू झाला आणि 3 ऑक्टोबर 2023 रोजी दुपारी 12:01 वाजता संपला. संपूर्ण रेखांकनाला 500 खडू आणि 23 तास लागले. या 3 दिवसांमध्ये मी चित्र काढत असताना 2 साक्षीदार सतत उपस्थित होते. संपूर्ण घटनेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात आले. 3 ऑक्टोबर रोजी सकाळी 11 वाजता NBC कार्यक्रमाचे चित्रण करण्यासाठी आले. संध्याकाळी 6 वाजता ही बातमी टीव्हीवर आली आणि नंतर 1-2 दिवस ते ही बातमी टीव्ही वर दाखवत होते.

मी रेखांकन पूर्ण केल्यावर प्रथम सर्वेक्षक श्री. कोजो आले आणि त्यांनी मोजमाप घेतले आणि ते नियोजित पेक्षा जास्त होते त्यामुळे मला खूप खूप आनंद झाला. अनेकांनी रेखांकनाला भेट दिली आणि आपल्या सदिच्छा आणि आनंद व्यक्त केला. तीनही दिवस लोक येऊन मला रेखांकन पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहीत करत होते. रेखांकन झाल्यावर, 5 दिवस पाऊस न पडल्यामुळे खूप लोकांना स्वतः येऊन चित्र बघता आले, खूप लोकांना टीव्ही वरील बातम्यांमुळे ह्या चित्राबद्दल माहिती झाली आणि मग ते भेटायला आले. अगणित लोकांच्या शुभेच्छा आता माझ्या पाठीशी होत्या.

दुसरा सर्वेक्षक ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी आले व त्यांनी मोजमाप केले. मागील अनुभवांवरून मी 2 सर्वेक्षकांची योजना केली होती जर एकाने सोडण्याचा निर्णय घेतला तर दुसरा होताच. दुसऱ्या सर्वेक्षकाने देखील पुष्टी केली की मोजमाप मी नियोजित केलेल्यापेक्षा जास्त होते आणि पहिल्या सर्वेक्षकाच्या मोजमापांच्या अगदी जवळ होते. एकंदरीत कार्यक्रम मित्र आणि कुटूंबियांच्या पाठिंब्याने खूप सुरळीतपणे पार पडला, पण इथपर्यंतचा प्रवास खडतर होता. हे सर्व यशस्वी झाले या समाधानाला तोड नाही.

1GB भागांमध्ये व्हिडिओ संपादित करण्यासाठी आणि इतर सर्व कागदपत्रे अपलोड करण्यासाठी आम्हाला दोन आठवडे लागले. आणि दसऱ्याला मोठी बातमी आली. त्यांनी मला ईमेल केला की माझा अर्ज मंजूर झाला आहे आणि आता मी गिनीज वर्ल्ड रेकॉर्डधारक आहे.

## दसऱ्याला मला खरे सोने मिळाले!!

**- प्रीति गुंडपवार**

# प्रिय आई - बाबा



**नमिता दांडेकर**

नमस्कार मंडळी! गेली जवळपास तीस पेक्षा जास्त वर्षे लहान मुलांची शिक्षिका म्हणून काम करताना मला  एक गोष्ट सातत्याने आणि प्रकर्षाने जाणवत राहिली कि जेवढं तुम्ही मुलांना शिकवता त्यापेक्षा कितीतरी जास्त ही मुलंच तुम्हाला शिकवत असतात. या माझ्या साहित्य दर्शनात या मुलांनी केलेले अतिशय मोलाचे सल्ले मी त्यांच्याच शब्दांत मांडत आहे.

"प्रिय आई बाबा, तुम्ही आम्हांला खूप खूप आवडता. पण मग मध्येच असं काय होतं? तुम्ही आमच्यावर वैतागता आणि आम्ही तुमच्यावर. आम्हाला बुवा जाम गोंधळायला होतं. आपण हा गोंधळ कमी करायचा का? मग त्यासाठी हे ऐकाच...

- आमचं हे वय त्रासदायक आहे असं मानू नका. नीट समजून घेतलंत तर हे वय आमच्याप्रमाणेच तुम्हालाही मजेशीर वाटेल.
- “प्रत्येक वस्तुची जागा ठरलेली असावी, प्रत्येक वस्तू जागेवर असावी" असं तुम्हीच म्हणता मग तुमचा चष्मा, घड्याळ हे शोधायला का लागतात?
- हुशार मुलंसुद्धा चुका करतात, आम्हीही हुशार आहोत, perfect मात्र नाही.
- आमचं सगळं चांगलंच आहे असं नका समजू, चांगल्याला चांगलं आणि वाईटाला वाईट म्हणा. आमच्या दोषांवर पांघरुण कशाला घालता?
- प्रामाणिकपणे कसं जिंकायचं आणि पराजय झालाच तर तो खिलाडूपणान कसा झेलायचा ते आम्हांला शिकवा.
- आमच्या प्रश्नांची उत्तरं द्या, अगदी ते प्रश्नं 'लैंगिक' ज्ञानाबद्दलचे असले तरी.

- आमच्याशी सर्व विषयांवर बोला, अगदी 'aids' सारख्या विषयावरही. कारण आम्हाला  कितीतरी कितीतरी गोष्टी माहीत नाहीत.

- कामावर जाताना मधून मधून आम्हाला तुमच्या बरोबर घेऊन जा म्हणजे आम्हाला कळेल तरी तुम्ही काय करता ते.

- जरी आम्ही बोलून दाखवत नसलो तरी तुम्ही आमच्यासाठी खूप काही करता याची आम्हाला नेहमीच जाणीव असते.

- आमच्यासाठी खास वेळ काढा. आपण कुठेतरी बसू - बोलू, एखादं पुस्तक वाचू, रोप लावू - काहीतरी मिळून करू. आमच्याबरोबर वेळ घालवताना तुम्हाला होणारा आनंद आम्हाला पाहू द्या.

- आमच्याबद्दल नुसत्याच अपेक्षा करता पण त्यामागची कारणं कोणती ते तर आम्हाला कळू द्या.

- आपला मुद्दा पटवून द्यायला आवाज चढवू नका, आम्हालाही तीच सवय लागेल.

- आमची भीती, आमचं घाबरणं किती मुर्खासारख आहे ते आम्हाला सांगू नका - आमची भीती समजावून घ्या.

- नियम नकोतच असं आम्ही म्हणत नाही पण त्या नियमांबरोबरच त्यांचे परिणाम सुद्धा समजावून द्या आणि तुमच्या लहरी प्रमाणे हे नियम बदलत नका बुवा जाऊ!

- आम्हाला कधीच तुच्छ लेखू नका - विशेषतः आमच्या मित्रमैत्रीणींसमोर!

- आम्ही कशानीही चिडलो तर आमचं आम्हालाच शांत होऊ द्या. त्या नंतर हवं तर सांगा, आमचं काय बरोबर होतं, काय चुकलं होतं ते.....

- आम्ही अमकाच खेळ खेळावा हा आग्रह का? आम्हाला सगळ्या खेळांची माहिती द्या. त्यातला आम्हाला जो आवडेल तोच आम्ही खेळू.

- तुम्हाला शोभतील असेच कपडे वापरा. तुम्हाला कोणी हसलं तर आम्हाला नाही आवडणार.....

- आम्ही मिळवलेल्या यशाची नोंद ठेवा, आम्हाला आणखी मिळवावसं वाटेल.

- आम्ही TV, Internet वर काय पाहतो याकडे लक्षं ठेवा कारण काही गोष्टी पाहण्या इतपत आम्ही मोठे झालेलो नाही. पण आमच्यावर सारखी पाळत नका ठेऊ. तुम्ही पालक आहात, police थोडेच आहात?

- घरची काही अडचण किंवा बाहेरची काही समस्या असेल तर त्याबद्दल आम्हाला जरूर सांगा. तुम्ही आम्हाला काही सांगितलं नाहीत तर आम्ही परके असल्यासारखं आम्हाला वाटतं.
- तुम्हाला वाटतो तितके आम्ही लहान नाही हे खरंच पण आम्ही स्वतःला समजतो तितके मोठेही नाही हेही तितकंच खरं!
- आमच्यावर तुम्ही जितकं प्रेम करता तितकंच तुम्ही दोघं परस्परांवरही करता हे पाहताना आम्हाला विलक्षण आनंद होतो!
- तुम्ही लहान असतानाचे तुमचे अनुभव आम्हांला सांगा. विशेषतः तुमच्या झालेल्या चुका, तुमची फजिती हे आम्हाला तुमच्या कडून ऐकायचंय......
- "चांगलं वागा" असं मोघम सांगून आम्ही कसं काय चांगलं वागू? चांगलं वागणं म्हणजे काय ते नक्की ठरवून सांगा ना!!
- आमच्या प्रश्नांची उत्तरं आम्हाला समजतील अशीच द्या. आम्ही अभ्यासात मागे पडलो तर आम्हाला शिक्षा नका करू. आमचा अभ्यास सुधारण्यासाठी फक्त मदत करा.
- "तुमच्या एवढे आम्ही असताना" या शब्दांनी बोलायला नका सुरुवात करू - आम्हाला तेच तेच ऐकायचा खरंच कंटाळा येतो!
- आमची चूक झाली तर रागवा जरूर पण तेव्हाही आमच्या वरचं तुमचं प्रेमच व्यक्तं होऊ द्या.
- आपल्या पूर्वजांबद्दल आम्हाला जरूर माहिती द्या. आमचा अभिमान वाढेल!
- आम्हाला तुमचं मन पुस्तकासारख वाचता येत नाही हे ठेवाल ना लक्षात?
- एखाद्या दिवशी तुमची मनस्थिती बरी नसेल तर तसं आम्हाला सांगा म्हणजे त्या दिवशी तुम्ही आमच्यावर ओरडलात तरी आम्ही त्याचं वाईट वाटून घेणार नाही.
- आम्हाला आमचं म्हणणं नीट शब्दांत मांडायला शिकवा. त्यासाठी आमचं बोलणं, लिहिणं याकडे बारकाईने लक्षं पुरवा.
- एखादा चित्रपट पाहून झाल्यावर त्याच्यावर आमच्याशी चर्चा करा. त्यामुळे एखाद्या गोष्टीचं मूल्यमापन कसं करावं हे आम्हाला कळेल.
- आमची स्वप्नं पुरी करायला आम्हाला उत्तेजन द्या - तुमच्या स्वप्नांपेक्षा ती वेगळी असली तरी......

- तुमचं आमच्यावरचं प्रेम व्यक्त करण्याचा सर्वात छान मार्ग सांगू? आम्ही जे सांगू ते लक्षपूर्वक ऐकणं!
- आमची चूक झाली तर तुमची क्षमा आम्ही मागूच पण समजा तुमची चूक झाली तर तुम्ही सुद्धा "sorry" म्हणायला काय हरकत आहे?
- सगळ्यात शेवटचं पण सगळ्यात महत्वाचं - नेहमी नेहमी तुम्हीच का हो आम्हाला शिकवायचं? आमच्या कडून सुद्धा शिका ना......कधीतरी.........

**- नमिता दांडेकर**

# डॉलर तुझ्याचसाठी

कधी ऐंशी , कधी सत्तर , उद्या शंभर झालेतर आणखी बेहत्तर
तुझ्याचसाठी हा सगळा खटाटोप...

येतो इथे घालून पृथ्वीप्रदक्षिणा
बनून राहतो  Eastern To Western

सँडविच पास्ता भरतो डब्यात
पण घरातमात्र आंबटगोड आमटीभात

मुलांचा इंग्लिश accent तर 'sounds so professional'
तरी शुभंकरोतीचे चालु असते घरात रोज पठण

तसं जगण्यासाठी लागतंय काय ?
एक छत, दोन मूठ अन्न, दोन जोडी कापड अन धडधाकट हात पाय
पण इतकंही ते सोपं नाय ...
मुलांचे शिक्षण, लग्नाचा खर्च, पेन्शन नसलेली आपली retirement
सांगा बरं करायचं काय?

मग आहे एक चांगला पर्याय...
माझी भूमी, माझी माय
सोडून दूर जावं लागणार हाय
सतत बघतो कोणती currency?
तिचा रुपयांत rate तरी काय?

'Wow ! The White Christmas, It's so perfect!'
'I love snow' म्हणत चढवतो jacket वर jacket
'Fa La La La SS  La SSS' च्या तालावर सजवतो Christmas tree घरात
पण मागच्याच महिन्यात फस्त केलेली असते लाडू-चिवड्याची परात
'Change is the only constant' म्हणत मस्तं होतो adjust
पण रोजचा India Call मात्र कधीच नाही विसरत

झाडु-पोछा, भांडी-स्वयंपाक सगळं करतो हसत-हसत
इडली-डोसा, दाल-बाटी, शाही पनीर
बनवू लागतो अगदीच सहज
Baking , Grilling सगळं अंगवळणी पडतं
आईच्या हातचं मात्र जीभेवर घुटमळतं

बाकी सगळं उत्तम असतं
गाडी, घर मोठठं असतं
standard of living म्हणे उंचावतं
privacy आणि शांतता मग आवडायला लागतं

असतो मजेत with busy routine...
'Back Home' मात्र सतत मनात येतं

मातृभुमीची ओढ कायम असते
पण डॉलरची किंमत मात्र वाढतच असते

**- सौ. कल्याणी आलोक पंडित**

# THE PREDICAMENT

Namit Tamhane

It was a pleasant Monday Morning in the year 2001 in Oklahoma with temperatures in upper 70s and as usual Rahul came out of his Apartment Building probably 40-45 mins before his Lecture was supposed to start. As usual, he crossed the parking spaces where the designated parking spots for all Apartments in his complex were and walked about half a mile towards the back of the apartment complex where a big trash receptacle was kept. For their entire apartment complex, there were 4-5 places where the trash receptacles were but this particular one was towards the very end of the complex. There was a lone parking spot next to the trash receptacle. Rahul stopped at the foot of the parking spot, looked both sides of the road carefully to check if any oncoming cars from the distance and when satisfied, he climbed up to the parking space and got into his car parked there. He backed up his car and when it was facing the right direction, he put the car in Park and got out. He climbed up the parking space again and started moving the trash receptacle. As usual he huffed and puffed, heaved and pulled and pushed and wriggled about 3-4 mins till the heavy metal trash receptacle was covering half way on the parking space. Satisfied, he wiped his brow to his handkerchief and got back in his car and drove to the University campus which was about a 10 min drive.

Reaching the campus, he drove past empty parking spaces next to the building where his class will start soon and reached at the last of the trash receptacles. He parked his car at the mouth of the lone parking space next to it and got out. A big, heavy metal trash receptacle was covering the parking space half way. Raul started working on it. He huffed and puffed, heaved and pushed and pulled and wriggled at the trash receptacle till the parking space was usable. He got back in his car and parked it in the spot. Got out and started walking briskly for his 10 min walk towards the building he had passed on his way. Met few friends who had parked their cars right in front of the classroom and went in for the lecture with them on time.

After his day in the University ends, Rahul will do all that what he did since morning in Reverse. He would back out his car from the University parking space, put it in park, pull the trash receptacle on the parking spot so that he can come again tomorrow and park there. Drive to his apartment's trash receptacle parking space and do the same thing there.

Rahul is my wife's cousin, one of the first from their family to arrive in the USA in 2001. Did his B Pharm from Nagpur and was pursuing post graduation in Pharmacy from Oklahoma University. Most Indian students who come to US usually live rather thriftily. At least, back in 2001-2002 they did. They drive low line second hand cars. Rahul was no exception. In 2001, he had a 1985 Nissan Altima. It wasn't in great shape but would take him from point A to point B. However, there is a small twist here. Here, the points A and B are not variables but constants. Point A was Rahul's apartment complex and Point B was his University. That too, only those two parking spaces next to the Trash Receptacles as mentioned above.

Want to do Grocery? Need Coffee? going to a party? A Movie? Rahul would ride along in a friend's car. So where would Rahul drive his car? Correct!, only between the two parking spaces next to the trash receptacle. Unlike his friends who had moved to apartments closer to the University, Rahul had to stay put.

If a person were to observe Rahul from a distance, it would be difficult to understand this rather peculiar behavior. Was Rahul trying to lose weight by purposefully parking car far? Was he not confident of driving and so parking at lone places? Did he have OCD? Was he doing a side hustle collecting trash? Basic logic would just rule out this confluence of thoughts.

The real reason was, due to a mechanical fault, Rahul's Nissan Altima didn't have a reverse gear. His car could not get into reverse gear at all. Both the parking spots he had carefully chosen next to the trash receptacles were on an incline. He would just get into his car, put the car in Neutral, open the driver side door, bring his left foot out and firmly push the asphalt for the car to slowly slide down the incline. While sliding down the incline, he had to carefully maneuver the car to make sure when the car stops, it is facing the direction where he needs to go. It was important for him to check oncoming traffic before hand. Even while the car is rolling backwards on the incline if he had to brake, he may get stuck. Repairs was something he couldn't afford and had decided to just let it "Slide" till he gets a job after his Masters.

Mandali, meet Rahul Jayawant, who in the last 22 years has done wonders in the field of Pharmacy, in between an MBA from IIM Ahmedabad. But with an equally laudable achievement of driving a car in the USA without reversing it even once for a full year!

**- Namit Tamhane**



चित्रकला: अनिल पंडित



रांगोळी : सुप्रिया बेले

# माझा आवडता प्राणी

## सुशांत गोसावी

कै. ज्ञानेश्वर उधळे स्मृती अंतरशालेय निबंध स्पर्धा

तृतीय पारितोषिक - कु. मयुर हंसराज बगळे, पाचवी 'अ'.

बर्डी कबुतरवाला माध्यमिक विद्यालय, मांजरी बुद्रुक

### निबंधाचा विषय - माझा आवडता प्राणी

माझा आवडता प्राणी माझे पप्पा आहेत. पूर्वी आजी त्यांना बायकोच्या ताटा खालचं मांजर म्हणायची आणि मम्मी त्यांना नंदी बैल. आमचे पप्पा रोज सकाळी ऑफिसला जायचे. मग कोव्हीड सुरु झाला. पप्पा घरूनच लॅपटॉपवर काम करू लागले. एकदा त्यांचा साहेब त्यांना डॉंकी म्हणालेला. मग एकदा पप्पा स्वतःलाच 'एलिफन्ट इन द रूम' म्हणलेले मी ऐकलं. पप्पा रोज बर्मुडा आणि बनियान घालून काम करायचे. एकदा गम्मतच झाली- पप्पांचा व्हिडिओ सुरु झाला आणि धावपळ उडाली. गडबडीत त्यांनी मम्मीचा टॉप घातला. तेंव्हा मम्मी पण त्यांना गाढवच म्हणालेली. त्यामुळे ऑफिसात पप्पा गाढव की हत्ती हे कळालेलं नाही. पप्पांचं ऑफिस मधलं काम पाहून मम्मी त्यांना झाडू-फरशी आणि भांडी घासायला लावायची. मग मम्मी त्यांना अजागळ म्हणायची आणि पुन्हा भांडी घासायची. अजागळ कुठला प्राणी माहित नाही. अजगर असावा. पण आमचे पप्पा अजगरासारखे नाही दिसत. गण्या काका म्हणतो की मास्क लावल्यावर ते माकडासारखे दिसतात. लॉकडाऊन मध्ये केस वाढले तर आजी त्यांना बोकड पण म्हणत असे.

लॉकडाऊन सुरु असतांना पप्पा रोज बाहेर जायचे. विड्या फुकायला जातात... असे मम्मी म्हणते. कुठली टपरी केंव्हा उघडी असते यावर कावळ्यासारखी नजर असते असे मम्मी आजीला सांगत होती. एकदा पप्पांना पोलिसांनी गाठलं. पुढे चार पाच दिवस ते पेंग्विन सारखे चालायचे. आणि कायम पालथेच झोपायचे. नंतर मग पप्पा मागे उशी बांधून जाऊ लागले. का? ते माहित नाही. पप्पा दुपारी

लॅपटॉप बंद करून अजगरासारखे झोपायचे आणि घोरायचे असं त्यांनीच गण्या काकाला सांगितलेलं मी ऐकलं. त्यांच्या पार्टीची तर गम्मतच होती. लॉकडाऊनच्या वेळी ते आणि गण्या काका रात्री पार्टी करत. त्यांच्या खास औषधाची दुकानं बंद केलेली मोदी काकांनी. तरी पण कुठून कुठून शोधून औषध आणत. एकदा मिलिटरी मधून आणलेलं तर एकदा तमन्ना हॉटेलच्या वॉचमनला पैसे चारून. पार्टीत औषध का पितात माहित नाही. पण औषध घेतलं की पप्पा पोपटासारखे बोलत. तुमच्यापेक्षा जनावरं बरी असं मम्मी म्हणत असे. 'कुठे डुकरासारखे गटारात पडाल आणि पोलिस घेऊन जातील कळणारही नाही' - असेही मम्मी ओरडायची. तेंव्हा पप्पा "चीते की चाल, बाज़ की नज़र" असे काहीतरी म्हणत. एकदा तर पप्पांनी औषध घेतलेले असतांना सोसायटी गेट वर त्यांना वॉचमन ने अडवलं. त्याला पोलीस समजून पप्पांनी त्याला दोन हजार रुपये दिले. तुम्हारे पप्पाका दिल शेर जैसा है असं काहीतरी ते वॉचमन काका नेहेमी बोलत असतात.

लॉकडाऊन वेळी सामान मिळणे खूप अवघड होते. या मोठ्या मोठ्या रांगा असत. गहू, तांदूळ, साखर, बिस्कीट आणि भाजी आणि दुधासाठी पण. पण पप्पा त्या लाईन मधून निसटून सामान पटापट घेऊन यायचे. कसे चिचुंद्रीसारखे हळूच घुसता हो? असे मम्मी कौतुकाने म्हणायची. कोव्हीड चे कुठलेही औषध मिळायला लागले की पप्पा तातडीने घेऊन यायचे. कोरोनील असो की अर्सेनिक अल्बम. अ,ब ,क ,ड जीवनसत्वाच्या गोळ्या, अमृतवेल, अश्वगंधा - गुळवेल, हैड्रोक्लोरोक्सीन, जलनेतीचे ते दबडे - कुठून काही ऐकले रे ऐकले की पप्पा घेऊन हजर. झपाटल्या सारखा वागतोयेस - माळ घे, जप कर असे आजी म्हणायची. पण पप्पा ऐकायचे नाहीत. झपाटलेला म्हणजे काय माहीत नाही. असेल कुठलातरी प्राणी. नंतर एकदा कोव्हीड खूप वाढला. पप्पांचे एक जिगरी मित्र संजय काका देवाघरी गेले. तेंव्हा पप्पा खूप खूप सॅड झालेले. वासरासारखे रडतात आठ दिवस झाले - असे मम्मी शेजारच्या काकूंना सांगत होती. नंतर आजीला पण कोरोना झाला. भजनाला जाऊ नकोस म्हणत होतो असे ते आजीला ओरडले. पण तीला दवाखान्यात ॲडमिट केले तर पप्पा दहा दिवस बाहेर बसून चातकासारखी तीच्या येण्याची वाट बघत होते. तीला सोडल्यावर पप्पा मोरासारखे थुई थुई नाचत सुटले.

मग आमच्या पपांनी गणपती आणला. तेंव्हा तर पप्पा खूप खुश होते. हे करू की ते करू कळत नव्हते. सगळी कामे उत्साहाने करत होते. कसे उंदरासारखे पळतायत असे मम्मी त्यांना चिडवत. पण मग पपांना कामावरून काढलं. मला खूप राग आला. पप्पा बर्मुडा घालून काम करतात म्हणून काढलं असं समजून मी बर्मुडा आणि बनियान फाडून टाकणार होतो. पण तसेच बसले तर काय? असा विचार केला आणि नाही फाडली. काम नाही आणि पैसे नाही म्हणून पप्पांची शेळी झाली होती. मग मम्मी त्यांना ओरडली. आजोबा पण कधी नव्हे ते बोलले. मग पप्पांनी कुत्र्यासारखा अभ्यास केला. कुत्र्यांचे कॉलेज असतात का माहीत नाही. पण पप्पांची खूप खूप अभ्यास केला. त्यांना अजून चांगला जॉब मिळाला. मम्मीला खूप आनंद झाला. 'आमचा वाघ आहे.. वाघ' म्हणत ती सगळ्यांना पेढे वाटत होती.

नवीन कामावर जाण्याआधी पप्पा आजोबांच्या पाया पडले तर त्यांच्याही डोळ्यात पाणी आले. ‘आता फिनिक्स पक्षासारखी भरारी घे’ असे आजोबा पप्पांना म्हणाले. हे सगळं वाचून तुम्हाला आमचे पप्पा हे माणूस नसून प्राणी संग्रहालय आहे असे वाटेल. पण गेल्या दोन तीन वर्षात पप्पांनी खूप अवघड परिस्थितीतून आम्हाला बाहेर काढले. ते खूप खूप चांगले आहेत. माझ्यावर कधीच ओरडत नाहीत. ते म्हणतात मयूर, माणसाने सरड्यासारखे असावे. परिस्थिती प्रमाणे स्वतःला बदलले की अवघड काहीच नसते. आय लव्ह यू पप्पा!

एवढे बोलून मी माझा निबंध संपवतो.

जय हिंद जय महाराष्ट्

**- सुशांत गोसावी**

# त्या वळणावर...

आठवते तुला आपली पहिली भेट?
धुंद श्रावण बहरला होता
त्या हिरव्या गार मख़मलीवर
हळूच माझा हात हातात घेतला होतास

तुझं माझ्या जवळ असणं
मनाला सूखवून जायचं
तूझ्या मिठीमध्ये विसावणं
मनाला भूलवून टाकायचं

तुझं ते मिश्किल हसणं आणि
चोरट्या नजरेनी हळूच मला पहाणं
किती सुंदर आयुष्य होतं आपलं

तूझ्या गालावरची ती मोहक खळी
जीवाला वेड लावून जायची
नजर न लागो कोणाची म्हणून
मीच स्वतःला चिमटा काढून घ्यायची.

लाडानी मला “पिल्लू” म्हणायचास
पण छोट्या छोट्या गोष्टींवरून मात्र
तूच उगीचच रुसायचास

काही स्वप्न होती माझी
जी मला फक्त तुझ्याबरोबर पूर्ण करायची होती.
आयुष्याच्या वाटेवरून चालताना
प्रत्येक वळणावर तुझी साथ हवी होती.

अशाच एका वळणावर सोडलास माझा हात
कोलमडून गेले शोधताना नवी वाट
सावरत होते आणि परत मोडून पडत होते
पण ओले डोळे मात्र फक्त तूझीच वाट बघत होते....

जिथे असशील तिथे तू सुखी रहा
सोडू नकोस तुझा विवेक
भेटेल तूला तुझी राजकुमारी नक्की
एवढीच माझी इच्छा एक

जवळचं माणूस शोधायला
खुप दूर जायला लागतं
तुझं वेडपट “पिल्लू” मात्र
फक्त तुझीच वाट बघत बसतं.....

**- रश्मी साठे**

# Gautam from my perspective

Alpana Naik

When I was approached to write something on Gautam for CTMM Gajara magazine I put on my thinking cap. I didn't know where and how to start describing a persona who touched so many lives in whatever time God destined him to be on this planet.



He was intelligent, knowledgeable, friendly, outgoing, adventurous, jovial etc. etc. I can go on and on by adding adjectives from my vocabulary. But words won't do justice describing his distinctive personality. This was Gautam who everyone knew.

But he was something more than what I described earlier. Gautam was very sensitive, avid dreamer, romantic and a self-satisfied person. He knew when and where to draw the boundaries. I think that's the reason why he wore so many hats in order to fulfill all his dreams. He was competitive but his competition was with himself and not with the world. He had set up some goals in his life to be achieved by the time he reached his forties and then live life on his own terms. And I



would say he definitely did that and I am really grateful to God that he was gifted with second innings to fulfill his dreams and live life on his own terms. He never bothered about what others would think of his achievements. He had defined his own measure of success and was almost successful in achieving that level given the brief time he had. I would say he lived his life to the fullest.



Be it jumping into the well at the age of 3 to be awarded by Late Prime Minister Atal Bihari Vajpayee, or winning quiz on Radio Vividh Bharati at the age of 10 and bagging Purushottam Karandak for best drama/actor. Be it finding his way back after getting lost in wilderness of jungle while trekking and spending entire night amongst snakes and wolves or being a merit list holder in 12 th grade or scoring 9 point GPA in IIT - he had achieved it all. And the list is endless. No one would have ever thought of establishing a trust in memory of his best friend to provide some purpose to his friend's mother who had lost her only son at the age of 21. He would have never liked me writing about his accolades but I want everyone to celebrate his life. That's the reason I am writing this today.

With Riya he was a complete different personality. He was not only her mentor but her best buddy she could have in her life. Both shared a unique bond and would read each other's thoughts so well. It was really unnerving to watch their interaction. She fondly called him her GPS as he was the only one who would be able to pull her out of any level of negative mood. The unique bond was very much evident as he breathed his



last only after he ensured that she had safely reached home from the wild fires on Pacific coast.



People think I dedicated my entire life to him but that's not the case. Just because his efforts were never visible no one knew that he was the supporting anchor in our lives. If not for him I would have never travelled all over for my work. Never complaining nor overpowering me. Whatever and wherever I am in my career, it is all thanks to him. I remember when I was in the UK, he had created an excel sheet outlining menu for the week and weekend plans including fun activities or socializing ensuring Riya should not miss having me around. That was the level of his planning and execution. He was a perfectionist to the core. Putting in his 100% efforts in any activity was his USP.

He always wanted to do things differently with his own rules. That's the reason he led his life in the most unconventional way. Being an entrepreneur at the age of 23, rather than accepting scholarship in the US University was the most daring plunge he took in his life. He always liked to take risks in life and many a times his risks worked in his favor. One of the most important risks was to relocate to the US as he wanted to provide the best education to Riya. Just that thought was enough for him to leave behind the comfortable semi-retired life and start afresh in the US. But that fact didn't daunt him at all. Despite all the odds he never gave up working on his creative side through the medium of blogs, writing scripts, honing up the singing skills or making new friends. He always believed in out of box thinking which was reflected in the CTMM events whenever he used to come up with some different concepts rather than run of the mill ones.

I could go on and on endlessly writing about Gautam and would never run out of words to describe him. But like he said all good things come to an end. So would like to finish with his most favorite song

“आने वाला पल जाने वाला है,

हो सके तो इस में ज़िन्दगी बिता दो,

पल जो ये जाने वाला है”.


Just a disclaimer I don’t claim to be a good writer as what Gautam was. It was just a humble attempt to sum up his personality from my perspective.

**- Alpana Naik**



# साधना

मनोज बा. उपाध्ये



साधना म्हटलं की आपल्यापैकी काहींना आठवेल ती हिंदी सिने सृष्टीतली देखणी नटी तर काहींच्या डोळ्यासमोर येतील ते वर्षानुवर्षे नृत्य/गायन/वादन आदि कलांची उपासना करणारे साधक....

अमेरिकेचा संघ मल्लखांबाची दुसरी विश्वचषक स्पर्धा खेळून परतला. संघातल्या खेळाडूंनी व्यक्तिगत आणि सांघिक कामगिरीत भरघोस परितोषिकं पटकावली. संघात नुकतेच टीनेजर झालेल्यांपासून ते पन्नाशी गाठणारे नवयुवक पण होते. या सर्वांचा प्रवास पाहिला आणि साधना म्हणजे काय, साध्य साधण्यासाठी किती हात लागतात याचा परत उलगडा झाला.

हिंदुस्थानापासून साता समुद्रापार असलेल्या अमेरिकेसारख्या देशात जिथं मल्लखांबाची कुणाला साधी तोंडओळखपण नाही अशा देशात मल्लखांबासाठी पूरक सोयी, सुविधा, प्रशिक्षक पुरवण्यासाठी मल्लखांब फेडरेशन ऑफ यूएसए (MFU) ने कंबर कसली. अमेरिकेसारख्या सुधारित देशात जिथं गोल्फ, लॉन टेनिस, आईस स्केटिंग, रग्बी फुटबॉल सारख्या खेळांचं वर्चस्व आहे तिथं या लोकांना मल्लखांब शिकवायची काय एवढी हौस असावी? बरं त्यांना आहे तर आहे पण ते पालक आणि त्यांची मुलं अन् मुलीपण मल्लखांब शिकायला जातात?

जेव्हा आपण आपल्या मातृभूमीपासुन दूर रहातो आणि ज्या गोष्टी करण्याला, पहायला झुरत रहातो त्या गोष्टींची मनाला लागेली ओढच बहुदा हे करायला लावते. MFU च्या संस्थापकांनी

आपल्या परसदारी, 2014 मध्ये मल्लखांब प्रशिक्षण केंद्र सुरु केलं. अमेरिकेतले कायदे कानून समजून घेतले. मल्लखांब शिक्षण केंद्रासाठी जागा शोधल्या, क्रीडा विमा उतरवले. भारतीय दूतावासाबरोबर पाठ पुरावा करुन मल्लखांबासाठी दोरी आणि खांब भारतातून मागवून अमेरिकेत उपलब्ध केले. यामागे संस्थापकांबरोबर कित्येक स्वयंसेवकांची मेहनत, साधना उभी आहे.

2016 मध्ये कनेक्टीकटला मल्लखांब केंद्र चालू झाले. संस्थापकांनी घराच्या तळघरामध्ये केंद्र सुरु केलं, नंतर मंदिराच्या हॉल मधे हलवलं, अल्पप्रतिसादाने केंद्र कधी बंद झालं ते कळलं नाही; पण कच न खाता काही वर्षांनी नव्या जोमाने कनेटिकट मल्लखांब केंद्र पुन्हा सुरु झालं. संस्थापकानी स्वखर्चाने अक्षरश: कनेटिकटमधे नाना प्रकारच्या दुकानांत खेटे घालून स्वत: मल्लखांब तयार केला. पूर्वीचं केंद्र उभारुन बंद होतानाच्या वेदना पचवून ते पुन्हा नव्या उमेदीनं ज्यानी सुरु केलं त्यांच्या ध्यासाला आणि धाडसाला काय म्हणावं?

अनेक परिश्रमातून मल्लखांब केंद्राची जागा, साहित्य, प्रशिक्षक, अभ्यासक्रम, स्वयंसेवकांची फौज उभी केली. अशा या कनेटिकटच्या कात टाकलेल्या मल्लखांब केंद्रामधून शिकलेला विद्यार्थी जेंव्हा विश्व मल्लखांब स्पर्धेच्या संघासाठी पात्र होतो तो जो क्षण आहे त्या क्षणाला मला सांगावसं वाटतं.....

अभी मुझ में कहीं, बाकी थोड़ी सी है ज़िन्दगी

जगी धड़कन नई, जाना ज़िन्दा हूं मैं तो अभी

कुछ ऐसी लगन इस लम्हे में है, ये लम्हा कहाँ था मेरा

तो लम्हा आणि त्यामागची ती लगन...साधना साधना ती अजुन काय? निरंतर परिश्रम आणि वाटेत आलेल्या सगळ्या अडथळ्यांवर मात करत संस्थापकांनी, स्वयंसेवकांनी, पालकांनी, आणि विद्यार्थी खेळाडूंनी पोटतिडकीने केली मल्लखांबाची उपासना यामध्येच अमेरिकन संघाच्या यशाचं गमक आहे आणि खरंतर या सर्वानाच यावेळचं परितोषिक समर्पित आहे.

मध्यरात्री नंतर सवाईमधे भीमसेनजींनी जसं रागांना आणि सुरांना खेळवावं ना किंव्हा झाकीरभाईंच्या बोटांनी तबल्यावर उमटवेल्या नादानं जशी मैफल भारावून जावी तसंच काहीसं अमरिकेच्या मल्लखांबवीरांची दोरी आणि पोल वरची प्रत्यक्षिके पाहून वाटले. स्पर्धेला जाताना केलेला तासंतासांचा आंतरराष्ट्रीय प्रवास, बदललेलं हवामान, पूर्णत:वेगळं जेवण, अंगाची लाही लाही करणारा उन्हाळा, असल्या आव्हानांचा लवलेशदेखील जाणवत नव्हता एकाही मल्लखांबवीराच्या प्रात्यक्षिकांमध्ये.

विविध प्रकराचे माउंट्स, डिस्माउंटस्, शॉर्ट आणि लाँग सेट करताना वेळेची मर्यादा सांभाळून सुसूत्रतेने केलेल्या अढ्या, आसने, दसरंग एक ना दोन... चॅम्पियनशिपची जी मैफल रंगली होती ना त्यात प्रत्येक खेळाडू आत्तापर्यंतच्या केलेलया रियाजाचे, गुरुंनी आणि पालकांनी आणि स्वतः केलेल्या कष्टांचं जणू प्रतिबिंबच उमटवत होता.

त्यांच्या मल्लखांबावरच्या आणि दोरीवरच्या सामर्थ्यपूर्ण पण तितक्याच विलोभनिय हालचाली बघून म्हणावसं वाटलं....

ये वही पल हैं

इस पल की जलवों ने महफ़िल संवारी है, इस पल की गर्मी ने धड़कन उभारी है

इस पल के होने से दुनिया हमारी है, ये पल जो देखो तो सदियों पे वारि है

जीनेवाले सोच ले, यही वक़्त है कर ले पूरी आरज़ू

हिंदुस्थानपासून, लक्षावधी कोस दूर असलेल्या देशाचा संघ इतकं सारं आत्मसात करू शकतो? असाध्य वाटणारं हे सारं साध्य झालंय ते केवळ साधनेमुळे...अभ्यासामुळे....मागच्या पिढ्यांनी पुढच्या पिढ्यांवर केलेल्या संस्कारांमुळं, मल्लखांबाच्या प्रसाराच्या ध्यासानं झपाटलेल्या संस्थापकांमुळं, मल्लखांब योगासने शिकवणारया प्रशिक्षकांच्या परिश्रमांमुळे, मल्लखांबाला प्रोत्साहन देणारया संस्थांच्या सहभागामुळे आणि मल्लखांब शिकणारया विद्यार्थ्यांच्या मेहनतीमुळं.....

मल्लखांबाचीच काय; पण कोणत्याही कलेची, विद्येची, पवित्र ध्येयाची साधना करणारया सर्वांना भावी प्रवासासाठी अनेक शुभेच्छा!!! असाध्य ते साध्य करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे।

बजरंग बली की जय!!!

**- मनोज बा. उपाध्ये**

# शक्यता विरुद्ध लढा

मीनल अवचट




माझ्याबद्दल थोडेसे तपशिलात:

मी माझ्या जोडीदारासोबत आणि दोन सुंदर मुलींसोबत राहते, ज्यांनी या प्रवासात नेहमीच मला प्रोत्साहन आणि विश्वास दिला. एक व्यवसाय म्हणून मी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात काम करते. त्याशिवाय मला वाचन, प्रवास आणि चित्रकलेची आवड आहे ज्यामुळे मला काहीतरी नवीन शिकण्यास मदत होते. काही वर्षांपूर्वी मी माझ्या पतीसोबत अमेरिकेत आले. संस्कृती आणि पर्यावरणासह माझ्यासाठी सर्व काही नवीन होते.

घरी बसण्याऐवजी मी माझा मोकळा वेळ कसा घालवणार हा सर्वात मोठा प्रश्न होता. तेव्हा मला हार्टफोर्ड लायब्ररी आणि विविध स्वयंसेवक संधींबद्दल माहिती मिळाली. म्हणून, मी स्वयंसेवक म्हणून काही वेळ घालवायला सुरुवात केली आणि मला हार्टफोर्डच्या वास्तविक समुदायाच्या विविध



तुकड्यांची ओळख झाली. त्यानंतर, मी हार्टफोर्ड सीटी डेटा विश्लेषण आणि वाढ प्रकल्पांमध्ये सामील झाले. विविध सांख्यिकीय साधने आणि विश्लेषणे वापरून आम्ही काही ॲप्स आणि स्रोत तयार केले जे त्यांच्या गुणवत्ता, परिणामकारकता आणि उपयुक्ततेसाठी राज्याने ओळखले होते.

२०२३ मध्ये मला प्रेरणा देणाऱ्या महिला हा पुरस्कार देऊन माझा सन्मान केला. हा पुरस्कार व्यावसायिक वाढ, महिला सक्षमीकरण, हार्टफोर्ड समुदाय नियोजन आणि विकास निर्णय सहभाग आणि उत्कृष्ट योगदान यासाठी आहे. संपूर्ण यूएसएमधील महिलांच्या उल्लेखनीय कामगिरी साठी हा पुरस्कार देण्यात येतो.

डीएफएस, हार्टफोर्ड सिटी बोर्ड सदस्य आणि समितीने विविध कारणांसाठी मला नामांकित केले.

- वैयक्तिक करिअर आणि व्यावसायिक विकास
- हार्टफोर्ड लायब्ररीमध्ये स्वयंसेवक कार्य - गणित शिकवणे, GED तयारी, गृहपाठ मदत इ.
- बजेट वाढवण्यासाठी हार्टफोर्ड शहर डेटा विश्लेषण आणि सांख्यिकीय अहवाल.
- सामाजिकदृष्ट्या प्रभावित समुदायांसाठी केस स्टडीचा सहभाग आणि त्यांना उपयुक्त संसाधनांकडे पुनर्निर्देशित करणे.
- विविध स्थानिक संस्थांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन महिला शिक्षण आणि सामुदायिक सहभागाद्वारे सक्षमीकरण.

ही कामगिरी बजावताना मला खूप आव्हांना सामोरे जावे लागले. सुरुवातीला, जेव्हा मी सामुदायिक कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हायला सुरुवात केली, तेव्हा कामाचे आणि आयुष्याचे  संतुलन राखणे ही एक तारेवरची कसरतच होती.

शेवटी, मी हे यश माझ्या आईला समर्पित करू इच्छिते जी माझ्या आयुष्यात नेहमीच खरी प्रेरणा असते.

**- मीनल अवचट**

# हसरे दुःख

**शकुंतला नरवाडकर**

भावनिक आणि मानसिक सगळ्या पातळीवर मनुष्य स्वभाव सारखाच असतो फरक असतो तो समाजव सामाजिक संस्कारात आणि समाज, संस्कृती, व संस्कार हे प्रत्येक देशाच्या भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असतात आणि त्यानुसार त्या देशाचे स्वावलंबन, सामाजिक बंधन, आत्मविश्वास ह्या गोष्टी उपजत गेलेल्या असतात, त्यावरून त्या त्या देशाची प्रगती उन्नती दिसून येते. हे सगळे अमेरिकेतील भौतिक परिस्थिती बघितल्यावर कळले.

जून मध्ये मुलांच्या शाळा संपल्या उन्हाळ्याची सुट्टी लागली, कुठे फिरायला जायचं विचार करून लास वेगासला जायचे ठरले. सकाळी सातची फ्लाईट होती. सकाळी साडेचारला पावसाने गर्जना केली खूप जोरात पाऊस विजेचा कडकडाट, असा पाऊस अमेरिकेत मी पहिल्यांदाच पाहिला. त्याच वेळात एअरपोर्ट वरून फोन आला आजचे फ्लाईट कॅन्सल झाले. मुले नाराज होऊ नयेत म्हणून आपल्याच गाडीने Maine ला जायचे ठरले. मुले खुश झाली कारण, त्यांना Casco bay island दरी कपाऱ्यात फिरायचा होते आणि त्यांच्या  साहसा मध्ये भर घालायची होती.

मुलांनी आपापल्या बॅग गाडीत टाकल्या आणि आमची सहल हसत खेळत सुरू झाली. गणपती बाप्पा म्हणून गाडीने निघालो रस्त्यात शर्टला शॉर्ट एमेला लक्ष्मीनारायण चे दर्शन घेऊन पोर्टलंडला, हो मवूड सुट्स बाय मिल्टन मध्ये पोहोचला दुसऱ्या दिवशी बार हरबर स्पोर्ट पोर्टलाईनच्या अकॅडमी पार्क बघायला निघालो मुलांच्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या, अमेरिकेतील सनी डे! मुलांचे लहानपण, मस्ती, दंगा स्वतःची गाडी न संपणारा रस्ता कुठे थांबा, कुठेहीत खा कुठलेही बंधन नाही. असे आम्ही अकॅडमी पार्क बघायला निघालो. अमेरिकेला निसर्गाने बहाल केलेले सौंदर्य डोळ्यात टिपताना निसर्गाचा, अबोल मानाचा अबोल उलगडा झाला. रिमझिम बरसणारा पाऊस, सर्वत्र रोडच्या दोन्ही बाजूंनी उभे राहिलेले घनदाट हिरवी झाडी, लपंडाव खेळणारा ऊन पाऊस, दोन कपारीतून दर्शन देणारे निळे आभाळ, सोनेरी कोवळे ऊन गुलाबी थंडीचा झोका आकाशात गर्द ढगात पालखी निघाल्यासारखे वाटत होते. कधी क्षितिजावर येणारे पांढरे पांढरे ढग सूर्याची वाट बघत होते. आकाशातिल निरनिराळ्या रंगाची उधळण,

मनाची प्रसन्नता, हा वेगळाच आनंद होता. अनेक वळणावर गाडी तळ्यात मळ्यात करत होती तेव्हा जीवनात येणाऱ्या वळण हे शिकून गेले आयुष्य हे असंच असतं वळणावर वळावे लागते. निळ्या आकाशांत पांढरे ढग बुट्ट्या काढलेल्या पैठणी सारखे वाटत होते. हिरवा डोंगर दोन कपाऱ्यातून आकाश लक्ष्मीनारायणाचे दर्शन घेतल्यासारखे प्रदक्षिणा घालत होते, सोनेरी कोवळे ऊन तर कधी गर्द ढगात, ढगाची पालखी निघाल्यासारखे वाटत होतं.

पोर्टलंडला आम्ही लाईट हाऊस वन्य प्राणी आणि बरच काही पाहून फेरीमध्ये फिरून येताना संध्याकाळचे सहा वाजले होते आम्ही एका कॉर्नर वर उभे होतो, दिवसभराच्या प्रवासाने मुले आम्ही सगळेच थकलेले होतो. वीस मिनिटाच्या अंतरावर एक इंडियन हॉटेल होतं तिथे जायचे ठरले. आमची पार्क गेलेली गाडी बरीच दूर होते, इतक्यात अचानक एक रिक्षावाला तेथून जात होता. मुले म्हणाले आपण ह्या रिक्षा बसून जाऊ. नंतर त्याला विचारण्यात आले हॉटेलपर्यंत सोडता का? रिक्षावाला एकदम हसमुख, हाय हॅलो करून, आमच्यात मिसळून गेला, आम्हाला तो आमच्या कुटुंबातलाच वाटला, त्याच्या चेहऱ्यावर कुठल्याच गोष्टीचे  टेन्शन नव्हते. आणि  भारतातले रिक्षावाले म्हणजे न उलगडणार कोडेच आहे. भारतातल्या रिक्षेला थांबून त्यांच्याशी बोलणे म्हणजे एनर्जी वाया घालावणे असंच आहे. ते कधीच इतके गोड हसतमुख, रिस्पेक्ट देणारे रिक्षावाले मला तरी आठवत नाहीत. आणि हा रिक्षावाला एकदम वेगळा. मला पायाने रिक्षात बसायला त्रास होता. मग त्या रिक्षावाल्याने थोडे पुढे साईडला थांबून थोड्या उंचावरून मला बसवले. बरोबर मुलीचे तीन मुले त्यासोबतच्या कुटुंबाचा एक मुलगा, अशी आम्ही पाच माणसे. तो हसत मुखाने गोड बोलून मुलांमध्ये रमून गेला. त्याला विचारण्यात आले किती पैसे घ्याल, तर त्याचे उत्तर एकदम थक्क करण्यासारखे –"ग्रँड मदर, मुले देतील तेच मी घेईन. मी आनंदासाठी रिक्षा चालवतो, मला रिक्षा चालवणे खूप आवडते". माझे मन वाऱ्यासारखे भारतात पोचले. आणि मला सापडले चेहऱ्या मागचे चेहरे. माझ्या मनाच्या किनाऱ्यावरती विचारांच्या लाटांचा प्रहार झाला.भारताचे रिक्षावाले एकदम रागिट, तुटक त्यांचा गोडवा हरवलेले व आनंद हरवलेले, घरातल्या आपल्या अडचणीं बरोबर, बेरोजगारी झुंज देणारे आणि सगळ्यात जास्त म्हणजे राजकारण, सामाजिक परिस्थिती, आर्थिक परिस्थिती, अशा अनेक परिस्थितीचा पगडा भारी असल्यामुळे स्वतःला सिद्ध करण्याची सामाजिक व्यर्थ मरमर. आपल्याला हवे असलेले निर्णय आपल्याला हवे तसे बघू शकत नाहीत, त्याचा परिणाम पश्चाताप करत बसणे, मनातल्या मनात अस्वस्थ होणे, या सर्वांचा परिणाम त्यांच्या दैनंदिनी जीवनावर होतो. तर दुसरा चेहरा विक्रम चेहरा अवखळ, अल्लड वाऱ्याच्या झुळकी बरोबर "फिक्र को धुवे मे उडाता चला गया"
अमेरिकेचा रिक्षावाला आत्मविश्वासाने काम करणारा, स्वतःचे तंत्र व मंत्र बाळगणारा  पण स्वैराचार नाही कामाची कृतघ्नता व्यक्त करणारा असा हा रिक्षावाला बघून माझे मन हसऱ्या दुःखात डूबून गेले आणि समाज बंधनातून बाहेर येण्यासाठी व असं जगणं नाकारण्यासाठी लेखक Richard Bach book लिहिलेलं Jonathan Livingston Seagull हे पुस्तक खूप आवडलं. याचा मराठी अनुवाद पण

आहे “तो एक सागरी पक्षी” ह्या पुस्तकात, धैर्य असेल तर कुठल्याही काम कमी नाही. कामात स्वतःला झोकून देणे हेच खरंतर ध्येय असावं. आणि मी चेहऱ्या मागच्या चेहऱ्याच्या हसऱ्या दुःखाचा निर्णय न घेता स्थितप्रज्ञ झाले.

**- शकुंतला नरवाडकर**





चित्रकला: अवनी अवचट

# बाल विभाग



चित्रकला: अवनी अवचट




## माझे छंद

चित्रकला: स्वरा कायंदे



## My inspiration (Nature)

Reeya Nimkarde

# माझ्या सवयी

## सोहम बिराजदार

मी एक आठ वर्षाचा छोटा मुलगा आहे, मीच माझा मार्गदर्शक आहे .

कसे म्हणताय? अहो मी शुभंकरोति म्हणायला तिसऱ्या वर्षी सुरवात केली, तेव्हाच माझ्या आईने व आजीने मला संगीतले. “मातृ देवो भव | पितृ देवो भव |आचार्य देवो भव” मी त्याचा अर्थ विचारला तेव्हा तिने सांगितले, “आपली आई , आपले बाबा, आपले टीचर आपणाला चांगले वागण्यासाठी जे जे सांगतात त्याचे अनुकरण केले तर आपल्या जीवनात चांगले वळण लागते”.

मी स्वावलंबी आहे - माझी स्कूल बॅग मीच भरतो, रोज होमवर्क् करतो, नोटबुक, पेन्सील, कलर सर्व जागच्या जागी ठेवतो, माझे कपडे कपाटात ठेवतो, स्पर्धे मधे भाग घेतो, खुप खेळतो, दंगा करतो, सर्वांशी प्रेमाने वागतो.

डॉईंग, गणित, सायन्स हे माझे आवडीचे वीषय आहेत. या आहेत माझ्या सवयी .

**- सोहम बिराजदार**

# धन्यवाद!

गजरा २०२३ च्या अंकासाठी योगदान दिलेल्या सर्व सदस्यांचे कॉनेटिकट महाराष्ट्र मंडळ सतशः आभारी आहे. आपल्या प्रोत्साहनामुळे आम्ही असेच नवनवीन उपक्रम आपल्या पर्यंत घेऊन येऊ.

आपला अभिप्राय आम्हाला नक्की कळवा - ctmmkarya@ctmm.org

अधिक माहिती साठी संपर्क साधा www.ctmm.org

### गजरा २०२३ Team

हेमंत कडेगांवकर (अभिकल्प/design)

स्नेहा सूर्यवंशी, अल्पना नाईक

कनेटिकट महाराष्ट्र मंडळ